RNI NO. MAHMAR/2020/84035


कायदेविषयक मार्गदर्शन मोफत



संपर्क
ॲड . सुशीला
मो नं 8766507294



BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ


दि.15 जानेवारी 2026



1931 पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी भाग घेतला.

1949 जानेवारी मनमाड येथे डॉ बाबासाहेब आंबेडकरांना पैशांची थैली अर्पण.

दि.बहन मायावती जन्म दिवस 1956

संकलन प्रा. यशवंत दुपटे


गुरूवार, १५ जानेवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : २१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Thursday, 15 January 2026 | Year : 6 | Issue : 21 | Daily | Rate: Rs. 5/-


## अडीच हजारांहून अधिक जणांचा आंदोलनात मृत्यू

# भारतीयांना तात्काळ इराण सोडण्याचे आवाहन

**नवी दिल्ली :** इराणमधील भारतीयांना तात्काळ इराण सोडण्याचे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. भारतीय विद्यार्थी, पर्यटक तसेच व्यावसायिकांनी तात्काळ इराणमधून बाहेर पडावे. तसेच आंदोलन सुरू असलेल्या ठिकाणांहून बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाने हिंसक वळण घेतले आहे. आंदोलनात अडीच हजारांहून अधिक जणांचा बळी गेला आहे. इराणच्या सुरक्षा दलाने आंदोलन मोडून काढण्यासाठी आंदोलकांवर हिंसात्मक कारवाई केल्याचे वृत्त आहे. तसेच हजारो आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. इराणमध्ये परिस्थिती चिघळली असून संयुक्त राष्ट्रसंघाने इराणला आंदोलकांविरोधात सुरू असलेली हिंसा थांबवण्याचे आवाहन केले आहे.



आंदोलकांचे समर्थन मिळत असलेल्या रझा पहलवी यांनी आज इराणमधील आंदोलकांना लढा सुरू ठेवण्याचे आवाहन केले. अमेरिकेकडून तुम्हाला मिळणारी मदत तुमच्यापर्यंत लवकरच पोहोचेल या डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याचा पहलवी यांनी पुनरूच्चार केला. दरम्यान, अमेरिकेने इराण बरोबर सुरू असलेली चर्चा पूर्णपणे थांबवल्याचे म्हटले आहे. आंदोलकांविरोधात हिंसक कारवाई केल्यास अमेरिका थेट हस्तक्षेप करेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला होता. इराणवर लष्करी कारवाई, कठोर कारवाई करण्याचा विचार करत असल्याचे ट्रम्प काल (मंगळवार) म्हणाले होते. AP या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार इराणमध्ये 2571 जणांचा आंदोलनात मृत्यू झाला आहे.

इराणमध्ये हजारो आंदोलकांना अटक करण्यात आली आहे. त्यातच इराणचे कायदेप्रमुख गुलामहुसेन मोहसेनी-एजेई यांनी तुरूंगातील आंदोलकांना लवकरात लवकर शिक्षा द्यावी व त्याची अंमलबजावणी करावी, असे आवाहन केले आहे. आपल्याला जे काही करायचे आहे ते लवकर करावे लागेल, उशीर केला तर त्याचा परिणाम होणार नाही, असे कायदेप्रमुखांनी म्हटले आहे. इराणमधील मानवाधिकार कार्यकर्त्यांनी इराणमध्ये कैदेत असलेल्या आंदोलकांना फाशीची शिक्षा होण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यानंतर कायदेप्रमुख गुलामहुसेन मोहसेनी-एजेई यांनी विधान केले आहे. त्यामुळे इराणमध्ये आणखी आंदोलन पेटण्याची शक्यता आहे. दरम्यान, इराणने 2000 हून अधिक जणांचा आंदोलनात मृत्यू झाल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे. अमेरिकास्थित HRANA या मानवाधिकार संघटनेने 2571 जणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले होते.

इराणने आज (बुधवारी) आजूबाजूच्या देशांना इशारा दिला आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केला तर आजूबाजूच्या देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला केला जाईल, असा इशारा इराणने दिला. रॉयटर्सने याबाबत वृत्त दिले.



## 16 जानेवारीला निकाल ?









# आज मतदान !

**नागपूर :** नागपूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. गुरुवारी, 15 जानेवारीला होणाऱ्या मतदानाची मतमोजणी शुक्रवारी, 16 जानेवारी रोजी सकाळी 10 वाजता सुरू होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतमोजणीची प्रक्रिया राबविण्यात येणार असून, शहरातील दहा झोन कार्यालयांमध्ये मतमोजणी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ईव्हीएमसाठी 20 टेबल आणि टपाल मतदानासाठी 4 टेबल ठेवण्यात आले आहेत. सर्व झोनमध्ये एकाचवेळी मतमोजणीला सुरुवात होणार असल्याने दुपारी 12.30 ते 1 वाजेपर्यंत स्पष्ट कल समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, यंदा निकाल जाहीर होण्यास काहीसा विलंब होण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मनपा प्रशासनाने मतदानासह मतमोजणीसाठीही संपूर्ण तयारी पूर्ण केली आहे. बुधवारी बूथनिहाय ईव्हीएमचे वितरण करण्यात येणार आहे. मतमोजणी प्रक्रिया प्रभावी व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रत्येक टेबलवर एक पर्यवेक्षक व एक सहायक नियुक्त करण्यात येणार आहे. सर्व मतमोजणी केंद्रांवर मीडिया सेंटरची व्यवस्था करण्यात आली असून, सर्व प्रभागांची मतमोजणी एकाचवेळी सुरू होणार आहे. तब्बल 9 वर्षानंतर मनपा निवडणूक होत असून, मागील वेळेच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या 2,700 वरून 3,004 पर्यंत वाढली आहे. यंदा 321 संवेदनशील मतदान केंद्रे ओळखण्यात आली असून, त्यापैकी 255 केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. महापालिका मुख्यालयातील कंट्रोल रूममधून संबंधित केंद्रांवरील घडामोडींवर थेट नजर ठेवता येणार आहे. यासाठीची संपूर्ण यंत्रणा अत्याधुनिक स्वरुपात सज्ज करण्यात आली आहे.

### राज्यातील `या' शहरात नव्या मतदारांचा विस्फोट!

**मुंबई :** राज्यातील 29 महापालिकांचा विचार करता पिंपरी-चिंचवडमध्ये मतदारांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ (44टक्के) नोंदवली गेली आहे. येथे मागील निवडणुकीच्या तुलनेत तब्बल 5,21,802 नवीन मतदारांची भर पडली आहे. आयटी हब आणि औद्योगिक विकासामुळे येथे स्थलांतरितांची संख्या वाढल्याचा हा परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अनेक शहरांमध्ये 50 हजार ते 5 लाखांपर्यंत मतदार वाढल्याने प्रभाग रचनेचे गणित पूर्णपणे बदलले आहे. नवीन मतदारांमध्ये तरुणांचे प्रमाण मोठे असल्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारा प्रचार आता महत्त्वाचा ठरणार आहे. मतदार वाढल्यामुळे निवडणूक आयोगाला संवेदनशील केंद्रांची संख्याही वाढवावी लागली आहे. उदा. ठाण्यात 176 तर पुण्यात 906 संवेदनशील केंद्रे जाहीर करण्यात आली आहेत. मतदारांना रांगेत उभे राहावे लागू नये यासाठी जास्तीत जास्त कर्मचारी आणि पोलीस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे.

### प्रचार थांबला; मतदार सज्ज; आता लक्ष मतदानाकडे...

**चंद्रपूर :** मनपा निवडणुकीच्या 10 दिवसांच्या प्रचाराचा मंगळवारी (दि. 13) शेवटचा दिवस शहरात प्रचंड राजकीय गजबजाट घेऊन उजाडला. सायंकाळी 5.30 वाजता प्रचाराची अधिकृत सांगता होणार असल्याने, सर्वच राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व ताकद पणाला लावली. उमेदवारांचा प्रचार थांबला असून मतदार मतदानासाठी सज्ज झाला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नेते विजय वडेट्टीवार, खासदार प्रतिभा धानोरकर, तर भाजपकडून भाजप नेते आमदार सुधीर मुनगंटीवार, माजी मंत्री हंसराज अहीर व आमदार किशोर जोरगेवार यांनी आपआपल्या पक्षातील उमेदवारांचा जोरदार प्रचार केला. शेवटच्या टप्प्यात रॅली, रोड शो, मिरवणूक, कॉर्नर सभा व प्रचार वाहनांसाठी सादर केलेले अर्ज प्रशासनाकडे प्रलंबित होते. सोमवारी (दि. 12) या अर्जांना मंजुरी देण्यात आली. मंजुरी मिळताच या उमेदवारांनी आपआपल्या प्रभागात जोरदार रॅली काढत प्रचाराचा शेवट गाजविला. किल्ल्याच्या आतील प्रभागांमध्ये महिलांच्या रॅलींना विशेष महत्त्व देण्यात आले. काही उमेदवारांनी 20 ते 30 महिलांचे पथक तयार करून `डोअर टू डोअर' प्रचार करत मतदारांपर्यंत थेट पोहोचण्याचा प्रयत्न केला. युवक व कार्यकर्ते भरदुपारीही घामाघूम होऊन प्रचारात व्यस्त दिसून आले.

## महत्त्वाच्या बातम्या

### हैदराबाद पोलिसांनी तीन पत्रकारांना घेतले ताब्यात

**हैदराबाद :** तेलंगणातील हैदराबाद पोलिसांनी एका महिला आयएएस अधिकाऱ्याविरुद्ध 'बदनामीकारक सामग्री' प्रसारित केल्याच्या आरोपाखाली तीन पत्रकारांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका महिला आयएएस अधिकाऱ्याविरुद्ध बदनामीकारक सामग्री प्रसारित केल्याच्या आरोपाखाली दाखल झालेल्या गुन्ह्यासंदर्भात बुधवारी (14 जानेवारी) एका तेलुगू टीव्ही वृत्तवाहिनीच्या तीन पत्रकारांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाला राजकीय वळणही मिळाले आहे. भाजप आणि भाजपने तेलंगणातील काँग्रेस सरकारवर हल्लाबोल केला आहे आणि दावा केला आहे की तीन पत्रकारांना 'अटक'करण्यात आली आहे. त्यांनी पोलिस कारवाईचा तीव्र निषेधही केला आहे.

### राहुल गांधी देणार 17 जानेवारीला इंदूरला भेट

**नवी दिल्ली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे शनिवार, 17 जानेवारी रोजी मध्य प्रदेशातील इंदूरला भेट देणार आहेत. दूषित पाणी पिऊन मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी ते भगीरथपुराला भेट देतील. त्याच दिवशी मध्य प्रदेशात मनरेगा योजनेचे नाव बदलल्याचा निषेधही काँग्रेस करणार आहे. मध्य प्रदेश काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे की काँग्रेस नेते आणि कार्यकर्ते देशातील प्रत्येक ब्लॉकमध्ये सामूहिक उपोषण करतील. ते गांधींच्या पुतळ्यांसमोर निदर्शने आणि भजनही करतील. यादरम्यान, भगीरथपुरामध्ये प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात येईल. आतापर्यंत भागीरथपुरामध्ये दूषित पाणी पिण्यामुळे 23 जणांचा मृत्यू झाला आहे. या मुद्द्यावरून राज्यातील राजकारणही तापले आहे. काँग्रेस राज्यातील मोहन यादव सरकार आणि मंत्री कैलाश विजयवर्गीय यांना कोंडीत पकडत आहे. त्याचबरोबर भाजपचे अनेक वरिष्ठ नेतेही या प्रकरणात स्वतःच्या सरकारला लक्ष्य करत आहेत.

## राज्याची अधिकृत भाषा मराठी बदलणार आहात काय ? : उच्च न्यायालय

**नागपूर :** महाराष्ट्रात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात मराठी शाळा बंद झाल्या आहेत. मराठी शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्नही होताना दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कल इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वळत आहे. शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे मराठी शाळांच्या अस्तित्वावर धोका निर्माण झाला आहे.



अशा परिस्थितीत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मराठी भाषा शाळांकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी राज्य शासनाची कानउघाडणी केली. राज्यात बंद होणाऱ्या मराठी शाळांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विचारणा केल्यावर मराठी शाळांमध्ये विद्यार्थी येत नसल्याचा युक्तिवाद राज्य शासनाकडून करण्यात आला. यावर उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत येत्या काळात राज्याची अधिकृत भाषा मराठी बदलणार आहात काय, असा मौखिक सवाल केला. राज्यात मराठी शाळाच नसतील तर अभिजात मराठीचा दर्जा टिकणार तरी कसा, असेही मत न्यायालयाने नोंदवले. शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे बंद होणाऱ्या मराठी शाळांबाबत 2017 पासून उच्च न्यायालयात जनहित याचिका प्रलंबित आहे. याचिकेवर सोमवारी न्या. अनिल किलोर आणि न्या. रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान, मराठी शाळा बंद होण्यामागे विद्यार्थी मिळत नसल्याचा युक्तिवाद सरकारी वकीलांनी केला.

## महिला आरोग्यासाठी महाराष्ट्रात मेनोपॉज क्लिनिक



**यवतमाळ :** महिलांच्या आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि विशेषतः चाळीशीनंतरच्या शारीरिक व मानसिक बदलांच्या काळात त्यांना आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. रजोनिवृत्ती (मेनोपॉज) काळात महिलांना भेडसावणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्यांवर उपाय म्हणून राज्यभरात विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे आज 14 जानेवारीपासूनच या उपक्रमाची अंमलबजावणी सर्व जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि महानगरपालिका रुग्णालयांमध्ये सुरू झाली आहे. बदलत्या जीवनशैलीत रजोनिवृत्तीचे आव्हान महिलांपुढे आहे. नैसर्गिकरित्या वयाच्या 45 ते 55 या दरम्यान महिलांमध्ये रजोनिवृत्तीची प्रक्रिया घडते. मात्र, आजच्या धकाधकीच्या जीवनात आणि वाढत्या तणावामुळे अनेकींमध्ये ही लक्षणे अकाली दिसू लागली आहेत. रजोनिवृत्ती म्हणजे केवळ मासिक पाळी थांबणे नव्हे, तर शरीरातील इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन या संप्रेरकांमध्ये (हार्मोन्स) होणारा मोठा बदल असतो, असे स्त्री रोग तज्ज्ञ सांगतात. या काळात महिलांना शारीरिक आणि मानसिक समस्यांचा सामना करावा लागतो. अचानक घाम येणे, अंगदुखी, सांधेदुखी, हाडांचा ठिसूळपणा आणि वजनात होणारी वाढ, अशा शारीरिक समस्यांसोबतच विनाकारण चिडचिड होणे, विस्मरण, तीव्र नैराश्य आणि झोपेचे विकार अशा मानसिक समस्यांना महिलांना सामोरे जावे लागते.

## मातृतीर्थ सिंदखेडराजात उसळला जनसागर



**बुलढाणा :** राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा 428 वा जन्मोत्सव सोहळा सोमवारी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत दर्शनासाठी बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील जिजाऊ व शिवभक्तांचा सकाळपासूनच जनसागर लोटला . सकाळी 6 वाजता राजे लखुजीराव जाधव राजवाड्यातील राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी वंशज राजे शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. तसेच केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक राजमाता माँ जिजाऊ यांची महापूजा करुन अभिवादन केले. यावेळी सिंदखेड राजाचे आमदार मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनीही राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सोमवारी सिंदखेड राजा येथील श्री लखुजाराव जाधव राजवाड्यातील जिजाऊ जन्मस्थळी भेट देवून अभिवादन केले. यावेळी त्यांनी जिजाऊ सृष्टीस भेट दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी संजय खडसे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी आदित्य सिंग, तहसीलदार अजित दिवटे, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, राज्य संघटक मनोहर तुपकर, जिल्हाध्यक्ष रविंद्र चेके, व्यवस्थापक सुभाष कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.


## भदंत नागदिपंकर यांना ५६ व्या वाढदिवसाच्या मंगलकामना...





:: शुभेच्छुक ::
परिवर्तन विचार मंच ,
स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्था
बहुजन सौरभ


## निज्जर हत्या प्रकरणात भारतीय उच्चायुक्तांनी कॅनडाला सुनावले खडेबोल



**नवी दिल्ली :** कॅनडा येथील भारताचे उच्चायुक्त दिनेश पटनायक यांनी नुकतेच दिलेल्या एका मुलाखतीत भारतावर आरोप करणाऱ्या कॅनडा सरकारला खडेबोल सुनावले आहेत. पटनायक यांनी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येशी भारत सरकारचा संबंध असल्याचा दावा जोरदारपणे फेटाळून लावला . इतकेच नाही तर त्यांनी कॅनडामधील प्रशासन त्यांच्या देशातील दहशतवादी घटकांच्या विरोधात कारवाई करण्यात '40 वर्षांपासून अपयशी' ठरले आहे, असा आरोपही त्यांनी केला. यावेळी पटनायक यांनी कॅनडा सरकारच्या दीर्घ काळापासूनच्या निष्क्रियतेवर तीव्र शब्दांमध्ये टीका केली. भारताला लक्ष्य करणारा कट्टरतावाद आणि हिंसेसाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

सीबीसी न्यूजशी बोलताना पटनायक यांना कॅनडाचे माजी प्रधानमंत्री जस्टिन ट्रूडो यांनी केलेल्या आरोपांबद्दल प्रश्न विचारण्यात आला होता. ट्रूडो यांनी भारताने निज्जर याची हत्या करून कॅनडाच्या अंतर्गत घडामोडींमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप केला होता. पटनायक यांनी आरोप हे पुराव्याशिवाय निराधार ठरतात असे सांगत कॅनडाने पुरावे द्यावेत अशी मागणी केली. 'मग, पुरावा कुठं आहे? प्रत्येकवेळी तुम्ही 'क्रेडिबल इन्फॉर्मेशन'बद्दल बोलत असता,' असे पटनायक आरोप फेटाळताना म्हणाले.

*'आम्ही नेहमीच सांगत आलो आहेत, हे हास्यास्पद आणि निरर्थक आहेत. हे असे काहीतरी आहे जे आम्ही करत नाहीत. या आरोपांना कुठलाही पुराव्याचा आधार नाही. असे आरोप करणे नेहमीच सोपे असते,' असे पटनायक म्हणाले.*

पटनायक यांनी जोर देऊन सांगितले की कॅनडामध्ये सध्या सुरू असलेला कायदेशीर खटला भारताचा हस्तक्षेप दाखवून देत नाही. तसेच त्यांनी नमूद केले की कॅनडाचे माजी पंतप्रधान आणि त्यांच्या टीमने केलेल्या वक्तव्यांमध्ये या आरोपांचे मूळ आहे, असे वृत्त वृत्तसंस्था एएनआयने दिले आहे.






## ७३ व्या वाढदिवसाच्या







अशोक बोंदाडे
राष्ट्रिय निमंत्रक, समता सैनिक दल
मो. 9423630004
(जन्म दिवस 15 जानेवारी 1953)

with best compliments from;
Tathagat Health Care Multispeciality Clinic
34, Jagrut Nagar, Tathagat Chowk, Nagpur -14

:: शुभेच्छुक ::
माया अशोक बोंदाडे (पत्नी)
डॉ. शैलेश बोंदाडे (मुलगा), डॉ. स्वाती बोंदाडे (सून)
डॉ. राहूल साखरे (जावई), डॉ. सिमा राहूल साखरे (मुलगी),
विनय बोंदाडे (मुलगा), मृणाल बोंदाडे (सून)
नातवंडः आरुष, अनाया, अहाना, अनविरा मारव्हेला सर्वांचे डॅडी.
डॅडी तुमच्या वाढदिवसाच्या शतशः मंगल कामना!
समस्त बोंदाडे परिवार, बहुजन सौरभ परिवार.



“ आपले काम जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे करणे, हाच सर्व सन्मानांचा मार्ग आहे. ”



बहुजन सौरभ

# संपादकीय

## संविधाननिष्ठ मतदान

महाराष्ट्र राज्यात 29 महानगरपालिकांच्या शहरी निवडणुका होत असताना, हे मतदान केवळ नगरसेवक निवडण्यापुरते मर्यादित नसून, त्या त्या शहराचे भविष्य ठरवणारे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ही निवडणूक म्हणजे लोकशाहीचा पाया मजबूत करण्याची संधी आहे. ‘आपले शहर कसे असावे?’ हा प्रश्न आज प्रत्येक सजग मतदाराने स्वतःला विचारणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीबाबत सांगितले होते की, ‘राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करावी लागते.’ महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपरिषद या संस्था केवळ रस्ते, पाणी, दिवे किंवा कचरा व्यवस्थापनापुरत्या मर्यादित नसून, त्या सामाजिक न्याय, समता आणि सन्मानजनक जीवनाच्या हमी देणाऱ्या संस्था आहेत. आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होत आहे. अनेक ग्रामपंचायती नगरपंचायत, नगरपरिषद आणि महानगरपालिकांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. हे नागरीकरण केवळ भौगोलिक नाही, तर सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे द्योतक आहे. अशा वेळी जर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जबाबदार, विकासाभिमुख आणि संविधाननिष्ठ प्रतिनिधी निवडून आले नाहीत, तर शहरीकरण हे प्रगतीऐवजी विषमता वाढवणारे ठरेल. डॉ. बाबासाहेबांनी ‘संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे’ असे स्पष्ट केले. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही आमिषाला, पैशाच्या प्रलोभनाला किंवा जात-धर्माच्या राजकारणाला बळी न पडता, निर्भीडपणे मतदान करणे ही काळाची गरज आहे. येणारा नगरसेवक हा आपल्या शहराच्या आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता, रोजगार आणि सामाजिक सलोख्याचा विचार करणारा असावा, ही अपेक्षा ठेवणे चुकीचे नाही, तर ती नागरिकाची जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विशेष अपेक्षा होत्या. कारण हीच व्यवस्था सामान्य माणसाच्या सर्वात जवळ असते. जर येथेच अन्याय, भ्रष्टाचार आणि असंवेदनशीलता असेल, तर लोकशाहीची मुळे कमकुवत होतात. म्हणूनच शहरी मतदारांनी ‘माझा नगरसेवक माझ्या शहराचा विकास करेल का?’ या प्रश्नावर केंद्रित राहून मतदान करणे आवश्यक आहे. आज मतदारांनी केवळ पक्ष, व्यक्ती किंवा घोषणांपेक्षा संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, पारदर्शकता आणि सर्वसमावेशक विकास यांना प्राधान्य द्यावे. आपले शहर कसे घडेल, आपले राज्य देशात अव्वल कसे राहील आणि लोकशाही अधिक मजबूत कशी होईल, या व्यापक दृष्टिकोनातून मतदान करणे हीच डॉ. बाबासाहेबांना खरे अभिवादन ठरेल. शेवटी एवढेच म्हणावे लागेल की, निर्भीड मतदान, सजग मतदार आणि संविधाननिष्ठ प्रतिनिधी, हाच महाराष्ट्राच्या शहरी विकासाचा खरा मार्ग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नसून ‘लोकांच्या जीवनात समानता, सन्मान आणि संधी निर्माण करणारी व्यवस्था’ असल्याचे स्पष्ट केले. शहरी निवडणुकांच्या संदर्भात हा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो, कारण शहर हे विषमता, वर्गभेद आणि वंचिततेचे केंद्रही बनू शकते. 1) **पाणीपुरवठा :–** नागरी हक्काचे उदाहरण डॉ. बाबासाहेबांनी मूलभूत गरजांना मानवी हक्कांचा दर्जा दिला. शहरात स्वच्छ पाणी मिळणे हा उपकार नाही, तर नागरिकाचा अधिकार आहे. अनेक झोपडपट्ट्यांमध्ये आजही टँकरवर अवलंबून राहावे लागते. नगरसेवक जर पाणी योजनांमध्ये पारदर्शकता आणत नसेल, तर ते संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा भंग आहे. अशा प्रश्नांवर भूमिका घेणारा प्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. 2) **झोपडपट्टी पुनर्वसन :–** सामाजिक न्यायाचा कस शहरीकरणात झोपडपट्ट्या वाढत आहेत. डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘राज्य हे दुर्बलांचे रक्षणकर्ते असले पाहिजे.’ पुनर्वसनाच्या नावाखाली गरीबांना शहराबाहेर हाकलणे हे विकास नव्हे. जे नगरसेवक पुनर्वसन करताना रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि वाहतूक यांचा समग्र विचार करतात, तेच खरे विकासाभिमुख ठरतात. 3) **आरोग्य व्यवस्था :–** महानगरपालिकेची कसोटी कोविड काळात हे स्पष्ट झाले की महापालिकेचे दवाखाने गरीबांचे आधारस्तंभ आहेत. डॉ. बाबासाहेबांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला महत्त्व दिले होते. खासगीकरणाच्या नावे सार्वजनिक दवाखाने दुर्लक्षित होणे म्हणजे आर्थिक लोकशाहीवर आघात. आरोग्य केंद्रे, मातृ-शिशु सेवा, मोफत औषधे यासाठी आवाज उठवणारे नगरसेवक निवडणे गरजेचे आहे. 4) **शिक्षण आणि शाळा :–** लोकशाहीचा पाया डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाला ‘वाघिणीचे दूध’ म्हटले. महानगरपालिकेच्या शाळा जर मोडकळीस आलेल्या असतील, शिक्षकांची कमतरता असेल, तर शहराचा विकास कागदावरच राहतो. नगरसेवकांनी शाळा, ग्रंथालये, अभ्यासिका यांसाठी निधी मिळवून दिला का, हा प्रश्न मतदारांनी विचारलाच पाहिजे. 5) **रोजगार व कौशल्य विकास :–** आर्थिक समतेचे उदाहरणशहरात स्थलांतरित मजूर, असंघटित कामगार मोठ्या प्रमाणात आहेत. डॉ. बाबासाहेबांनी श्रमाचा सन्मान आणि किमान वेतन यावर भर दिला. महानगरपालिकांनी कौशल्य प्रशिक्षण केंद्रे, स्वयंरोजगार योजना, स्ट्रीट व्हेंडर्ससाठी सुविधा दिल्या नाहीत, तर नागरी विकास अपूर्ण ठरतो. 6) **महिलांचे प्रश्न :–** समानतेचा आरसा, सुरक्षित रस्ते, प्रकाश व्यवस्था, स्वच्छ सार्वजनिक शौचालये, पाळणाघरे, हे मुद्दे महिलांच्या सन्मानाशी जोडलेले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी महिलांना कायदेशीर हक्क देऊन सामाजिक क्रांती घडवली. या सुविधा देणारा नगरसेवक म्हणजेच संविधानातील लैंगिक समानतेचा रक्षक आहे. 7) **पारदर्शकता व भ्रष्टाचार :–** लोकशाहीचा श्वास डॉ. बाबासाहेबांनी इशारा दिला होता की, ‘भ्रष्टाचार लोकशाहीचा घात करतो.’ रस्ते, गटारे, कंत्राटे, यामध्ये पारदर्शकता नसेल तर शहराची दुर्दशा होते. माहितीचा अधिकार, नागरिक सभा, वार्ड समित्या सक्रिय ठेवणारे प्रतिनिधी खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी ठरतात. 8) **पर्यावरण आणि शाश्वत विकास :–** भविष्याचा विचार डॉ. बाबासाहेबांचा दृष्टिकोन दीर्घकालीन होता. कचरा व्यवस्थापन, नाले स्वच्छता, नदी-तलाव संवर्धन, वृक्षारोपण, हे मुद्दे केवळ पर्यावरणाचे नाहीत, तर सार्वजनिक आरोग्याशी जोडलेले आहेत. अल्पकालीन फायद्यासाठी निसर्गाची हानी करणारा विकास डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना धरून नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून पाहिले तर शहरी निवडणूक म्हणजे संविधानाची अंमलबजावणी तपासण्याची परीक्षा आहे. मतदारांनी आमिष, भावनिक घोषणा किंवा जातीय समीकरणांपेक्षा शहराचे दीर्घकालीन हित, सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांचा विचार करून निर्भीड मतदान करणे हीच काळाची गरज आहे. सजग मतदारच जबाबदार नगरसेवक घडवू शकतो आणि जबाबदार नगरसेवकच संविधाननिष्ठ शहर घडवतो. ■ ■

# अमेरिकेतील 2300 मैलांची भिक्खूंची शांतता पदयात्रा

**अमेरिकेतील 2300 मैलांची शांतता पदयात्रा आणि ‘आलोका द पीस डॉग’ हा करुणा व बंधुभावाचा नवा प्रकाश उदयास आला आहे. आजचे जग अत्यंत जटिल आणि तणावग्रस्त परिस्थितीतून जात आहे. युद्धाची धग, धार्मिक ध्रुवीकरण, राजकीय संघर्ष, आर्थिक स्पर्धा आणि सामाजिक अविश्वास या सर्वांमुळे मानवतेसमोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे. अनेक देशांमध्ये निरपराध नागरिकांचा जीव जात आहे; घरदार उध्वस्त होत आहेत; लाखो लोक निर्वासित म्हणून जगभर भटकत आहेत.**

समाजाच्या मनात भीती, द्वेष आणि संशयाची भावना प्रबळ होत आहे. अशा काळात शांतता, करुणा, प्रेम आणि बंधुभाव यांचा आवाज पुनः एकदा जगभर ऐकू जाणे आवश्यक आहे. अशा अस्थिर परिस्थितीत अमेरिकेत आरंभ झालेली 2300 मैलांची बौद्ध भिक्खूंची ‘Walk for Peace’ ही शांतता पदयात्रा आशेचा एक मोठा प्रकाशकिरण ठरली आहे. टेक्सासमधील फोर्ट वर्थ शहरातून सुरू होऊन वॉशिंग्टन डी. सी. पर्यंत चालणारा हा प्रवास केवळ भौगोलिक अंतराचे मोजमाप नाही, तर मानवतेला पुन्हा एकत्र आणणारा, करुणा जागवणारा आणि सामाजिक सौहार्द निर्माण करणारा एक महत्त्वाचा अध्यात्मिक प्रयत्न आहे. या यात्रेमध्ये एकूण 19 भिक्खू सहभागी आहेत आणि या संपूर्ण पदयात्रेचे नेतृत्व मुख्य भिक्खू संपुर्ण शांतीभद्र करीत आहेत. त्यांचे साधेपण, धैर्य आणि करुणेचे व्यक्तिमत्त्व हा या शांततेच्या संदेशाचा मुख्य स्रोत बनला आहे. यात्रेतील सर्वात प्रेरणादायी आणि विलक्षण गोष्ट म्हणजे भिक्खूंसोबत चालणारा एक साधा भटका कुत्रा ‘आलोका द पीस डॉग.’ भारतीय परिआ जातीचा हा छोटासा कुत्रा आज जगभर शांततेचे प्रतीक बनला आहे. त्याची कथा या पदयात्रेला भावनिक शक्ती आणि जिवंत अर्थ देते. ‘आलोका’ निष्ठेचा जिवंत धडा आहे. आलोका हा मनुष्य नाही, परंतु त्याने दाखवलेले धैर्य, निष्ठा आणि समर्पण हा मानवतेला नव्याने जाणवणारा संदेश आहे.

112 दिवसांच्या एका शांतता यात्रेदरम्यान ‘आलोका’ अचानक भिक्खूंच्या मागोमाग चालू लागला. सुरुवातीला तो काही वेळात थांबेल असे वाटले, पण तो दिवसेंदिवस सोबत राहू लागला. त्याला कोणतीही ओळख नव्हती; कोणतेही नाव नव्हते. भिक्खूंनी त्याच्या चिकाटीने प्रभावित होऊन त्याला ‘आलोका’ अर्थात ‘प्रकाश’ हे नाव दिले. तीव्र उन्हात, मुसळधार पावसात, धुळीत आणि चिखलातही तो थकून-भागून चालत राहिला. यात्रेच्या एका टप्प्यावर तो एका कार अपघातात गंभीर जखमी झाला, परंतु त्याने ट्रकमध्ये बसण्यास नकार दिला आणि ट्रकमधून उडी मारून पुन्हा पायी चालण्याचा अढळ निश्चय दाखवला.





भिक्खूंना ते पाहून आनंद आणि भावुकता दोन्ही अनूभूत झाले. एक छोटा जीव एवढी निष्ठा आणि त्याग दाखवू शकतो, हे लोकांना आश्चर्यचकित करणारे होते. भिक्खूंचा अनवाणी प्रवास मोठा विलक्षण आहे. या पदयात्रेत मुख्य भिक्खू संपुर्ण शांतीभद्र आणि बाकी भिक्खू संध्यानंद, विपुलशांत, मेत्ताभद्र, तसेच अन्य मुख्य भिक्खूंने अनवाणी म्हणजे कोणतेही पादत्राणे वापरून न चालता चालण्याची पद्धत स्वीकारली आहे. ते म्हणतात की, पावलांमधून शरीराची वेदना अनुभवणे आणि त्यातूनही शांततेला चालना देणे हे त्यांचे ध्येय आहे. त्यामुळे त्यांची चाल फक्त भौतिक चाल नाही, तर एक ध्यान प्रक्रियेप्रमाणे आहे. मुख्य भिक्खुच्या पायाला चालतांना जखम झाली. त्यांच्या पायाला कापड गुंडाळून चालण्याचे फोटो प्रदर्शित झाले. मुख्य भिक्खू आणि आलोक हे पादत्राणे परिधान करत नाहीत. इतर भिक्खू पायमोजे आणि जोडे, चप्पल वापरतांना दिसतात. हे एकात्मता, संयम आणि दयाभावाचे अनुष्ठान आहे. या शांतता यात्रेला अमेरिकन नागरिकांनी मोठा आणि मनापासून प्रतिसाद दिला आहे. भिक्खू ज्या गावात पोहोचले, तेथे लोकांनी अन्न, औषधे, निवारा आणि पाणी देण्यासाठी मोठ्या आत्मियतेने व्यवस्था केली. काही लोकांनी त्यांच्यासोबत काही मैल चालत शांततेचा संदेश प्रत्यक्षात अनुभवला. मुले, महिला आणि वृद्ध सर्वांनी हातात ‘Walk for Peace’ अशी फलक घेऊन या यात्रेला समर्थन दिले. लोकांच्या चेहऱ्यावर शांततेचा प्रकाश दिसून येऊ लागला आणि अनुभवलेले संवाद हे अनेकांना स्वपरिवर्तनाचे कारण बनले. टाइम मासिकाने ‘Monks on a Journey’ या मुखपृष्ठाद्वारे या यात्रेचे आणि आलोकाचे जगासमोर सुंदर दर्शन घडवले. त्यानंतर सोशल मीडियावर ही पदयात्रा जागतिक चर्चेचा विषय बनली. नागरिकांनी आलोकाचे फोटो, प्रवासी भिक्खूंची चित्रे आणि शांततेच्या संदेशाचे व्हिडिओ हजारो पद्धतीने शेअर केले. बुद्धांच्या शिकवणींचा आधुनिक अनुवाद या यात्रेद्वारे भिक्खू बुद्धांच्या मूलभूत संदेशांना आधुनिक भाषेत आणि प्रत्यक्ष कृतीत उतरवत आहेत. बुद्धांनी सांगितलेली अहिंसा, करुणा, मैत्रीभाव, समता, सहअस्तित्व आणि संयम ही तत्त्वे आज जगाला सर्वाधिक आवश्यक आहेत. भिक्खूंनी पदयात्रेदरम्यान केलेले प्रबोधन अतिशय मूल्यवान आहे. भिक्खूंच्या मते ‘शांतता म्हणजे फक्त हिंसा नसणे नव्हे; शांतता म्हणजे मनात प्रेम, सहिष्णुता आणि विश्वासाची निर्मिती होय.’ ‘धर्माचा उद्देश माणसाला जोडणे आहे, विभाजित करणे नाही.’ त्यांची निःशब्द चाल जगापर्यंत एक दूरगामी संदेश पोहोचवते. द्वेषाला उत्तर द्वेषाने देऊ नका; करुणा आणि संवादानेच संघर्ष मिटतात. भिक्खूंचा लोकांसाठी संदेश अतिशय अनमोल आहे. या यात्रेदरम्यान भिक्खू जेथे थांबतात, तेथे ते लोकांना काही साधे पण प्रभावी संदेश देतात. त्यांच्या मुख्य विचारांमध्ये खालील संदेश विशेष महत्त्वाचे आहेत ‘शांतता बाहेरून मिळत नाही; ती मनातून निर्माण करावी लागते.’ मनातील द्वेष, राग, असहिष्णुता आणि अहंकार कमी केल्याशिवाय जगाला शांती मिळू शकत नाही. ‘प्रेम ही सर्वात मोठी सार्वत्रिक भाषा आहे.’ जाती, धर्म, भाषा किंवा रंगापेक्षा प्रेम मोठे आहे; प्रेमाने सर्व अंतर मिटतात. ‘मानव आणि निसर्ग एकमेकांचे पूरक आहेत.’ पृथ्वीचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. ‘हिंसा ही कमजोरीची निशाणी आहे; करुणा ही खऱ्या शक्तीची ओळख आहे.’ करुणा दाखवणारा मनुष्य दुर्बल नसतो; तो सर्वात दृढ असतो. ‘लहान कृतींनी मोठा बदल घडतो.’ एक हास्य, एक मदतीचा हात, किंवा एक सौम्य संवाद अशा संदेशातून शांततेची बीजे रुजतात. भिक्खूंच्या या संदेशांनी अनेकांनी आपल्या जीवनात सकारात्मक बदल करण्याचा संकल्प केला आहे. यात्रेचा खरा अर्थ म्हणजे 2300 मैलांची ही यात्रा केवळ एक भौगोलिक प्रवास नाही; ती मानवतेचे अंतर कमी करण्याचा प्रयत्न आहे. ती भीतीवर आशेचा विजय आहे. ती विभाजनावर मैत्रीभावाचा विजय आहे. ती द्वेषापेक्षा प्रेम अधिक शक्तिशाली आहे हे सिद्ध करणारी घटना आहे. आलोका या छोट्या कुत्र्याने जगाला दाखवून दिले की निष्ठा, करुणा आणि प्रेम यांना ना सीमा असतात, ना धर्म. संपूर्ण पदयात्रेत भिक्खूंनी अनवाणी चालण्याचा कठोर प्रयत्न केला आहे, हे साधेपण, त्याग आणि निःस्वार्थ भावनेचे प्रतिक आहे. आज जगात धर्माच्या नावाने एक दुसऱ्याकडे संशयित भावनेने बघण्याची पद्धत रुजू होत आहे. अनेक देशात विद्वेशाचे वातावरण निर्माण होत आहे. शेजारच्या देशांसोबत सुद्धा मैत्रीपूर्ण संबंध असले पाहिजे. सगळ्याच धर्माच्या धर्मगुरूंनी आणि जनतेनी सुद्धा विश्वबंधुत्वासाठी प्रयत्न केले पाहिजे. अशा कठीण वेळी जगात मैत्री, बंधुता आणि शांती निर्माण करण्यासाठी हा भिक्खूंचा प्रवास केवळ एक आंदोलन नाही, तर एक सजीव आशेचा आणि मैत्री, बंधुत्व निर्माण करण्याचा महान संदेश आहे, जो संदेश तथागत बुद्धाने अडीच हजार वर्षांपूर्वी या जगाला दिला होता. ■ ■



पुरुषोत्तम संबोधी
मो.9422803760

# राजकारणाने संविधानातील सुंदर स्वप्नांना फसविले!

शिक्षण कशासाठी? तर भारतात संविधानाला अभिप्रेत प्रबुद्ध भारतीय माणूस निर्माण करण्यासाठी आहे. शिक्षणाने संविधानाला अभिप्रेत आधुनिक मानसशास्त्र आजवर घडवायला हवे होते. ताठ कण्याची, प्रश्न विचारणारी, डोक्यात संविधान घेऊन वावरणारी कोट्यावधी मने इथे शिक्षणाने आजवर निर्माण करायला हवी होती. शिक्षणाने जाणीवपूर्वक इथे वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवायला हवे होते. संधीची आणि दर्जाची समानता, सामाजिक न्याय आणि बंधुता, समाजवाद अशा संकल्पनामधून भारतीय संविधान आकारास आले आहे. प्रजासत्ताक लोकशाही म्हणजे लोकांनी लोकांच्या कल्याणासाठी निवडून दिलेले जनप्रतिनिधी, जे राज्य चालवतात. घटनेचे 46 वे कलम सांगते की, राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन विशेष काळजीपूर्वक करील आणि सामाजिक न्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करेल, शिवाय 29 आणि 30 व्या अनुच्छेदद्वारे अल्पसंख्यांकांना शिक्षण संवर्धनाची व्यवस्था संविधानाने केली आहे. मागच्या 75 वर्षाची संविधानाची वाटचाल बघितली तर राजकारणाने संविधानाला, संविधानाच्या अपेक्षांना आणि संविधानाच्या सुंदर स्वप्नांना फसविले आहे असे दिसते. प्रजासत्ताक अजून इथे सुरू होत नाही. कारण संविधानाला अभिप्रेत समाज जन्माला येणार नाही याचीच काळजी इथे राजकीय सत्ता घेताना दिसते.

सामाजिक न्याय म्हणजे समाजातील सर्व घटकांना स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर आधारित सर्वच क्षेत्रात समान संधी देणे आणि देशातील संपत्ती व संसाधनाचे योग्य व्यवस्थापन होईल अशी धोरणे राबवणे आणि जाती आधारित भेदभाव संपुष्टात आणून वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणणे होय. तर आर्थिक न्याय म्हणजे प्रत्येकाला शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि आर्थिक व्यवहारांमध्ये कोणताही भेदभाव न करणे होय आणि राजकीय न्याय म्हणजे नागरिकांना राजकीय प्रक्रियेत समान संधी आणि अधिकार मिळणे. जात, धर्म, वंश, लिंग किंवा सामाजिक स्थितीचा अडथळा नसावा. कायद्यापुढे सर्व समान असावे किंवा सरकारने सर्वांसाठी निःष्पक्षपणे काम करणे. भारतीय संविधानात सामाजिक न्यायामध्ये दुर्बल घटकांचे सक्षमीकरण या अंतर्गत दलित, आदिवासी, महिला, अल्पसंख्यांक यांच्यासाठी विशेष संरक्षणाची हमी आहे. मानवी प्रतिष्ठेअंतर्गत प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची हमी दिली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधीच म्हटले होते कि, ‘जोपर्यंत सामाजिक व आर्थिक न्याय मिळत नाही, तोपर्यंत राजकीय स्वातंत्र्य निरर्थक आहे’. सामाजिक न्याय म्हणजे फक्त कायदेशीर समता नव्हे तर प्रत्यक्ष आयुष्यात समानता, सन्मान आणि संधी मिळणे. तो लोकशाहीचा आत्मा आणि मानवी स्वातंत्र्याचा खरा आधार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते, ‘उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस क्षीणबल होऊन अल्पायुषी होतो. पण शिक्षणाचे अभावी तो निर्बुद्ध राहील्यास जीवंतपणी तो दुसऱ्याचा गुलाम होतो.’ शिक्षणाचा अभाव जसा माणसाला गुलाम करतो, तसा शिक्षणाचा स्पर्श माणसाला गुलामीतून सोडवतो. शिक्षणाशिवाय सामाजिक मुक्ती शक्य नाही. भांडवलशाही आणि धर्मांधता अशा दुहेरी अरिष्टात आज शिक्षणव्यवस्था सापडलेली आहे. आज सरकारी धोरणांचा अभाव व निधीची कमतरता किंवा सामाजिक न्याय विभागाच्या निधीचा राज्यकर्त्यांकडून दुरुपयोग यासारख्या कारणामुळे पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना 2022 पासून फेलोशिपची जाहिरातच प्रसिद्ध केल्यामुळे, आर्थिक अडचणीमुळे फेलोशिप न मिळाल्याने विद्यार्थी पीएचडी सोडत असतील तर तो सामाजिक न्यायाचा पराभव आहे. महाराष्ट्रातील पीएचडीधारक संशोधक विद्यार्थ्यांनी या विषयाशी संबंधित अनेकदा अर्ज, विनंत्या, निवेदन देऊन सरकारला या प्रश्नाकडे गांभीर्याने बघण्यास सांगितले. पण महाराष्ट्रातील वित्तमंत्री, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पीएचडी धारकांविषयी दृष्टिकोन पूर्वग्रहदूषित असल्याचे अनेकदा प्रत्ययास येते. नुकतेच त्यांनी विधानसभेत पीएचडी मिळावी म्हणून एकाच कुटुंबातील पाच-पाच जण पीएचडी करत असल्याचे उपहासात्मक बयाण दिले. आता हा सर्वे त्यांनी कोणत्या आधारावर केला? आणि एकाच कुटुंबातील पाच जण जर पीएचडी करीत आहे. म्हणजेच सामाजिक न्यायाकडे आपण वळत आहोत असा अर्थ त्यांनी समजायला पाहिजे होता. फेलोशिप न मिळाल्याने विद्यार्थी पीएचडी सोडत असतील तर तो सामाजिक न्यायाचा पराभव आहे. पीएचडी धारकांना फुकटचे पैसे दिले जात आहे की काय? एका विद्यार्थ्याला पीएचडी रजिस्ट्रेशन करण्यापासून तर अनेक कामांसाठी कोणकोणत्या अग्नी दिव्यातून पार जावे लागते हे मुख्यमंत्र्यांना कसे कळणार? निवडणूक जिंकावी म्हणून लाडकी बहीण योजनेला सपोर्ट करणारे हे राजनेते स्वाभिमानी जीवन जगण्याचा परिपाठ कसे काय समजून घेतील? पीएचडी करून काय दिवे लावणार का? असे उपमुख्यमंत्री जेव्हा विधान करतात तेव्हा सत्तेच्या अहंकारांनी मदमस्त झालेल्यांना बुद्धिमत्तेची किंमत काय कळणार? सत्ताधारी विसरतात की लोकशाहीत जनता ही सार्वभौम असते आणि जनप्रतिनिधी लोकांची सेवा करण्यासाठी त्या पदावर बसलेले असतात. पण शिक्षणाचे महत्त्व त्यांनाच समजणार ज्यांनी शिक्षणासाठी अतोनात कष्ट घेतलेले आहेत. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला न्याय समतेने, सन्मानाने जगण्याचे आश्वासन दिले होते. पण वर्तमानातील परिस्थिती त्या स्वप्नांना तडा देत असल्याचे नेहमीच प्रत्येक येते. संशोधक विद्यार्थ्यांना (बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय, अमृत) हक्काच्या फेलोशीपसाठी रस्त्यावर उतरून सध्या आंदोलन करावे लागत आहे. जेव्हा सरकार संशोधनावरचा खर्च कपात करते तेव्हा ते अप्रत्यक्षपणे देशाच्या प्रगतीचे दारे बंद करते. देशात संशोधकाला जर पोटासाठी आंदोलन करावी लागत असतील तर संविधानातील समान संधी आणि पुरोगामी भारताचे स्वप्न फसत असल्याचे दिसून येते. संविधानाने कायद्याचे राज्य प्रस्थापित केले आहे. पण प्रत्यक्षात सत्ता आणि संरक्षण कोणीकडे आहे? तर कुलदीप सिंगर (उन्नाव प्रकरणातील दोषी) ब्रिजभूषण शरण सिंह किंवा हाथरस यासारख्या प्रकरणांमध्ये असे दिसून येते की आरोपीकडे राजकीय सत्ता असेल तर कायद्याची प्रक्रिया अत्यंत संथ होते किंवा पिडितेलाच न्यायासाठी मोठा लढा द्यावा लागतो. जेव्हा राजकीय पक्ष गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला पाठीशी घालतात किंवा त्यांना उमेदवारी देतात तेव्हा संविधानातील ‘नैतिक लोकशाहीचा’ पराभव होतो. पीडीतेला न्याय मिळवण्याऐवजी आरोपीचा सत्कार होणे हे संविधानाने पाहिलेल्या ‘न्याय’ या स्वप्नांची मोठी थट्टा आहे. ईडी, सीबीआय यासारख्या संस्थांचा वापर राजकीय सुडबुद्धीने करणे हे संविधानाने दिलेल्या ‘स्वायत्ततेच्या संकल्पनाला’ तडे देणारे आहे. अंधश्रद्धांच्या विकासासाठी या देशात कोट्यावधींची उधळण केली जाते. धार्मिक, जातीय दंगली, वाढलेली महागाई, शिक्षणाचा झालेला बट्ट्याबोळ, गरिबांना गुलाम बनविण्याचे षडयंत्र, प्रदुषणाच्या लाटा, अतोनात जंगलतोड हे सर्व संविधानद्रोहच तर आहे. ज्यांना समता नको, सामाजिक न्याय नको, बंधुता नको त्यांनी हे माणसाला महानायक करणारे संविधान बदलण्याची आणि मनुस्मृतिला देशाचे संविधान म्हणून प्रतिष्ठित करण्याची मोहीम अप्रत्यक्षपणे या देशात राबविलेली दृष्टीपथ्यास येते. थोडक्यात सांगायचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान सर्वश्रेष्ठ आहे. पण ते राबवणारी राजकीय व्यवस्था स्वार्थी आणि नैतिकतेपासून दूर गेलेली आहे. जोपर्यंत सामान्य नागरिक आपल्या संविधानिक अधिकारांप्रती जागरूक होऊन राजकारण्यांना प्रश्न विचारणार नाही तोपर्यंत सुंदर स्वप्नांची फसवणूक थांबणार नाही असेच आजची ही परिस्थिती बघून सांगावेसे वाटते. ■ ■






सरिता सातारडे
मो. 8308853051

# तथागताचे पवित्र पिप्रहवा रिलीक्स : एक शोध

नुकतेच दिल्ली येथे तथागताचे पवित्र पिप्रहवा रिलीक्सचे द लाइट अँड द लोटस - रिलीक्स ऑफ अवेकन्ड वन या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घाटन नुकतेच 3 जानेवारीत 2025 केंद्र शासनातर्फे करण्यात आले. प्रदर्शनात प्रथमच भारतीय राष्ट्रीय संग्रहातील अवशेष व पिप्रहवा येथील अवशेष जे शतकाहून अधिक काळानंतर भारतात परत आणण्यात आले आहेत, त्याचाही समावेश होता.

1) **पिप्रहवा चे भौगोलिक स्थान :–** हे भारताच्या उत्तर प्रदेश राज्यातील सिद्धार्थनगर जिल्ह्यातील सिद्धार्थनगर शहराजवळील एक गाव आहे. हे ऐतिहासिक बुद्धांच्या जन्मभूमीच्या मध्यभागी आहे आणि गौतम बुद्धांचे जन्मस्थान मानल्या जाणाऱ्या लुंबिनीच्या जागतिक वारसा स्थळापासून जवळ आहे. पिप्रहवा हे शाक्य राज्याची राजधानी असलेल्या कपिलवस्तुच्या प्राचीन शहराचे ठिकाण होते, जिथे सिद्धार्थ गौतमाने आपल्या आयुष्याची पहिली 29 वर्षे घालवली होती. यानंतर पिप्रहवा स्तूप व तेथील रिलीक्स काय आहेत हे आपण जाणून घेऊ या

2) **पिप्रहवा स्तूपाचा इतिहास :–** तथागत हे बोधिसत्व असल्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनाचा अंत होणार याची पूर्वकल्पना होती व ही बाब त्यांनी शिष्य भिक्खु आनंद यांचेशी Share केली होती. त्यावर भिक्खू आनंद यांनी आपले निधनानंतर आपली आठवण कशी राहील याबद्दल मार्गदर्शन करावे अशी विनंती तथागतांना केली. त्यावेळी तथागतांनी भिक्खू आनंद यांना त्यांच्या निधनानंतर करावयाची विधी समजावून सांगितली. निधनानंतर माझे अवशेष एका कलशात ठेवून त्यावर एक मातीचा Mound करावा. ज्याला त्यावेळेच्या बोली भाषेत थुपा म्हणायचे. (त्यानंतर त्याचा अपभ्रंश होऊन ते स्तुपा व नंतर स्तूप झाले) तथागताचे महापरिनिर्वाण इ.स. पुर्व 483 मध्ये झाले. त्यांच्या अस्थी व अवशेष कोणी ठेवाव्या याबद्दल तेव्हांचे शासक यांच्यात मतांतर तथागताच्या मध्यम मार्ग या तत्त्वानुसार तथागतांच्या अस्थी व अवशेष यांचे आठ भाग करण्यात आले. हे भाग म्हणजे मगधचे अजातशत्रू, वैशालीचे लिच्छव्हीज, कुशिनगरचे माल्या, पावाचे माल्या, अलाकप्पाचे बुलीज, रामगृहचे कोली, कपिलवस्तुचे शाक्य व वेदादीपाचे




ब्राह्मण असे आहे व या आठही ठिकाणी नंतर स्तूप बांधण्यात आले. यापैकी कपिलवस्तु म्हणजेच पिपरव्हा येथे तथागताचे महापरिनिर्वाणानंतर लगेच बांधण्यात आले. ते या आठही स्तुपापैकी सर्वात आधी बांधण्यात आले होते. शाक्यांनी स्तूप बांधल्यानंतर शतकानुशतके बुद्धाच्या जन्मभूमीत पर्शियन, अरब, मंगोल, मुघल आणि विविध हूण यांच्या एकापाठोपाठ आक्रमणे झालीत. या दरम्यान बौद्ध धर्माची बरीचशी चिन्हे नाहीशी झाली.

3) **विल्यम क्लॅक्सटन पेपे यांनी केलेले उत्खनन :–** दोन सहस्र दशकापेक्षा अधिक काळ, शाक्यांनी बांधलेला स्तूप शाबूत राहिला आणि नेपाळच्या सीमेवर असलेल्या पिप्रहवा गावाच्या बाहेर वनस्पतींनी झाकलेला होता. 1896-97 च्या भारतात झालेल्या दुष्काळात इंग्रजांनी काही क्षेत्रात पाण्याची आवश्यकता म्हणून खोदकाम केले. त्याचवेळी संयोगाने ब्रिटिश वसाहती अभियंता व जमीन मालक असलेला विल्यम क्लॅक्सटन पेपे, यांचे जमलेल्या मोठ्या मातीच्या ढिगाऱ्याने लक्ष वेधून घेतले. झाडी आणि जंगल साफ केल्यावर, त्यांनी ढिगाऱ्यातून खोल खंदक बांधण्याचे काम सुरू केले. 18 फूट भक्कम वीटकाम खोदल्यानंतर ते एका मोठ्या दगडी कोशात आले. ज्यामध्ये अस्थी, सोन्याचे दागिने आणि मौल्यवान दागिने असलेले कलश होते. या अवशेषांमध्ये एकाच ठेवीमध्ये मौल्यवान अर्पणांचा सर्वात मोठा समूह होता. सुमारे 1800 रत्न आणि अर्ध-मौल्यवान खडे, रॉक क्रिस्टल, मोती, कवच, कोरल, नक्षीदार शीट सोने आणि चांदी, दाणेदार सोने होते. यापैकी एका कलशामध्ये अस्थी सापडल्या. या कलशावर पाली भाषेत ब्राम्ही लिपित काही कोरले होते. यावर बरेच संशोधन होउन कोरलेल्या शब्दावरून त्या अस्थी तथागताच्या असल्याचे सिद्ध झाले. तसेच जी मौल्यवान रत्ने सापडलीत ती तथागतांचे कुटुंबाशी सबंधित असल्याचे आढळून आले.

4) **तथागताचे अवशेष भारताबाहेर गेल्याचा इतिहास :–** उत्खननात मिळालेल्या अस्थी, अवशेष व मौल्यवान रत्ने याबद्दल पेपे यांनी त्यावेळी ब्रिटीश शासनाला अवगत केले होते. त्याचवेळी ही त्यांची वैयक्तिक खोज असुन त्याचा काही भाग मला देण्यात यावा असा आग्रहही धरला. पेपे यांच्या मागणीप्रमाणे त्याचा काही भाग त्यांना देण्यात आला व उर्वरित भाग ब्रिटीशांनी इंडियन म्युझियम कलकत्ता येथे ठेवला. यांत मुख्यतः तथागताच्या अस्थीचा व अवशेषाचा समावेश होता. यानंतर सदर अस्थीचा व अवशेषाचा काही भाग ब्रिटिशांनी थायलंड, श्रीलंका व म्यानमार यांनाही दिल्याचे कळते. पेपे यांनी नेलेला काही भाग जो मुख्यतः मौल्यवान रत्ने होता त्याची, त्यांचे कुटुंबीय यांनी धरोहर म्हणून 127 वर्षे जतन केला. परंतु 2013 साली पेपे यांचे वंशज क्रिस पेपे याना पैशाची गरज भासल्यामुळे त्यांनी जुन्या धरोहराचे लिलाव करणारी UK तील एक संस्था Sotheby's यांचेशी संपर्क साधला

5) **केंद्र शासनाची भुमिका :–** या धरोहराचा लिलाव Sotheby's ची हाँगकाँग येथील शाखेतर्फे मे 2025 मध्ये होणार होता. त्याची माहिती केंद्र शासनास कळली व तो लिलाव पुढे ढकलण्यात ते यशस्वी झाले. भारतातील अस्तित्वात असलेल्या विविध कायद्याच्या आधीचे हे प्रकरण असल्यामुळे ते भारतास कायदेशीररित्या मालकी हक्क दाखविणे शक्य नव्हते. म्हणून एक मध्यम मार्ग स्विकारण्यात आला. केंद्र शासनाने गोदरेज कंपनीशी Public Private Partenership स्थापन केली. गोदरेज कंपनीने आर्थिक गणित सोडवून रत्ने त्यांच्या प्रयत्नातून भारतात परत आणलीत.

6) **दिल्लीला जानेवारी येथे आंतर्राष्ट्रीय प्रदर्शन :–** केंद्र शासनाचे सांस्कृतिक मंत्रालय तर्फे The Light & the lotus : Relics of the Awakened one या नावाने ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे आयोजन राय पिथोरा सांस्कृतिक संकुल, नवी दिल्ली येथे 3 जानेवारी 2026 ला करण्यात आले होते. यात पिप्रहवा येथील Repatriate केलेली रत्ने, संग्रहालयातील पिप्रवहा येथील अवशेष व महत्त्वाच्या पुरातन वास्तुचा समावेश होता. सदर प्रदर्शन हे लोकांकरीता खुले करण्यात आलेले आहे. पिप्रहवा (प्राचीन कपिलवस्तु) येथील तथागतांच्या अस्थी, अवशेष व इतर वस्तु या शाक्य वंशाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत. त्याचे बुद्धाच्या जीवनाशी आणि शिकवणींशी थेट संबंध म्हणून प्रचंड आध्यात्मिक महत्त्व धारण करणारे आहेत. निश्चितच ते जगभरातील बौद्ध समुदायाकरीता पुज्यनीय आहे व धम्म अधिक मजबूत करण्यास आवश्यक आहे. अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रदर्शन हे देशांतर्गत बौद्ध समुदाय असलेल्या महत्त्वाचे शहरात भरविण्यात यावे. एव्हढेच नव्हेतर ते थायलंड, श्रीलंका, म्यानमार, जपान, कंबोडिया आदि बौद्ध राष्ट्रात आयोजित करण्यात यावा अशी विनंती बौद्ध संस्थानी केंद्र शासनास द्यावी ही रास्त अपेक्षा. ■ ■



इंजि. नरेंद्र ताकसांडे
मो. 9422922668

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### विजयादशमीदिनीच रिपब्लिकन पक्षाची स्थापना हा लेख अतिशय चिंतनशील

विजयादशमी दिनीच रिपब्लिकन पक्षाची स्थापना हा बहुजन सौरभ या दैनिकात प्रकाशित झाले ला प्रा. प्रवीण कांबळे लेख वाचला. लेख अतिशय चिंतनशील आहे. रिपब्लिकन पक्ष हा पक्ष नसून ती चळवळ आहे. समाजातील घटकांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढून न्याय मिळवून देण्याचे काम या पक्षाने त्याकाळात केले. आपल्या लेखातून पक्षाची व्यापक असणारी ध्येय धोरणे, पक्ष सर्वसमावेशक का झाला नाही. केवळ एकांगी मांडणी न करता काळाच्या मर्यादा लक्षात घेऊन तर्कशुद्ध व बुद्धीप्रामाण्यवादी विचारातून पक्षाला उभारी मिळेल. यातूनच हा देश समर्थ राष्ट्र म्हणून उभा राहील. एवढी मानवतावादी विचारसरणी या देशातील कोणत्याही पक्षात नाही. हे आपला लेख वाचून कोणत्याही सुजाण वाचकाला निश्चितच प्रत्यय आल्याशिवाय राहणार नाही. लेखासाठी आपणास शुभेच्छा व बहुजन सौरभ आभार.

**प्रा. राजेंद्र कांबळे**

### वास्तववादी, अग्रगण्य, दिशादर्शक लेख

दै. बहुजन सौरभमध्ये प्रकाशित लेख प्रत्येक पिढी करिता जबाबदारीचा जयभीम हा विलास गजभिये यांचा लेख आंबेडकरी चळवळीसाठी महत्वपूर्ण लेख आहे. नागपूर येथे 14 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा का घेतली असेल? किती मोठा डॉ. बाबासाहेब यांचा नागपूरवर विश्वास होता, विलास गजभिये यांच्या लेखातून दिसते. वास्तववादी, अग्रगण्य दिशादर्शक असा लेख आहे. आंबेडकरी चळवळीसाठी अशाच लेखनाची गरज आहे, आपण अप्रतिम लेख प्रसिद्ध केला आहे त्या बद्दल दै. बहुजन सौरभचे आभार.

**विलास खरात**

“ विज्ञानाची कास धरल्याशिवाय देशाची व समाजाची प्रगती अशक्य आहे. ”



# ये पब्लिक है सब जानती है सबकी सुनती और मनसे मतदान करती है

**खरे म्हणजे आजच्या वर्तमान काळातील जनता सुशिक्षित, सुज्ञ व खरे खोटे जाणून विचार करून अंतिम निर्णय घेणारी असल्याने, त्यांना कोणत्याही प्रकारच्या प्रचाराची मुळीच आवश्यकता नसते. कोणतीही निवडणूक लागण्यापूर्वीच जनमाणसात त्याबाबतच्या चर्चा व्हायला लागतात आणि त्यातून ते बरेच काही शिकतात. काही मतदारांची मानसिकता कायम विशिष्ट पक्षाच्या विचारसरणीशी जुळली असली तरी, कालांतराने त्यांच्या मनातील पक्षाने मुळ विचारधारा सोडली तरच ते इतर पक्षाचा मतदानासाठी विचार करतात, अन्यथा ते आपल्या पुर्वापार चालत आलेल्या पक्षालाच मतदान करतात.**

मात्र, सद्यःस्थितीत साऱ्याच राजकीय पक्षांनी आपापली मुळ विचारधारा सोडल्याने मतदार सुद्धा सैरभैर झालेत. हे नाकारता येत नाही. अनेक अपक्ष उमेदवार ऐन निवडणुकी तोंडावर येताच जनतेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. त्यामुळे ना घरका ना घाटका अशी त्यांच्यावर पाळी येते. अशांनी मागील पाच वर्ष जनतेच्या संपर्कात राहून त्यांची अडलीनडलेली कामे करण्यासाठी पुढाकार घेतल्यास त्यांच्या पाठीशी जनता उभी राहते. परंतु त्यांच्याकडून जनतेची कामे करण्यात अथवा जनतेचा जनसंपर्क ठेवण्यात सातत्य असायला हवे. अपक्ष उमेदवारांमध्ये जर कार्यक्षम व लायक उमेदवार असलेतरी त्यांच्या विजयाची भिस्त प्रथम जनतेचा विश्वास, स्वभाव आणि कार्यपद्धती यावरच असली तरी अशांच्या जोडीला जर एकापेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरले असतील तर अपक्षांच्या मतांची विभागणी होऊन लायक व कर्तव्यदक्ष उमेदवारांना सुद्धा पराजयाला सामोरे जावे लागते. सोबतच अशांची विचारधारा एक असली तरी जर ते एकापेक्षा अधिक उमेदवार असतील तेव्हा त्यांच्या मतांची विभागणी होऊन विजयाच्या जवळ पोहोचलेल्या उमेदवाराला सुद्धा पराजयाचा सामना करावा लागतो. एकंदरीत उमेदवारांच्या खचाखच भरलेल्या गर्दीने त्यांचे पाय एकमेकांत अडकले जातात आणि त्यामुळे संघटितपणे एकास एक लढणाऱ्या उमेदवारांना दुफळीवर मात करण्याची आपसूकच संधी मिळते आणि खऱ्याअर्थाने जनतेच्या हितासाठी काही तरी करू पाहणारे कर्तव्यदक्ष उमेदवार अनेकदा पराभूत होतांना दिसतात. ते टाळले गेल्यास अपक्षांच्या विजयाची सुद्धा खात्री देता येते. तसे पाहता कितीही म्हटले तरी पक्षाचे अधिकृत उमेदवार हे इतरांपेक्षा सरसे ठरत असतात, कारण त्यांच्या मागे पक्षाचे संघटन, आर्थिक व वैचारिक बळ असतेच. कारण पक्षाच्या भरवशावरच कधीकाळी ग्राम पंचायतच्या निवडणूकीतून पुढे आलेला सामान्य कार्यकर्ता राज्याच्या मुख्यमंत्र्यांपासून तर केंद्रीय मंत्र्यांपर्यंत गेल्याचे सर्वांना माहीत आहे. सांगण्याचे तात्पर्य हेच की, आजच्या सुधारीत व बदलत्या काळात ढोल ताशे वाजवून, रॅली काढून तसेच मोठमोठ्या आवाजाने वाहनांवर भोंगे लावून प्रचार केल्याने, तसेच कार्यकर्ते, सहकारी मित्रांसाठी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्याने मतदारांच्या मनाचे परीवर्तन होईलच असे होत नाही. कारण आजच्या मतदार जनतेने कुणाला मतदान करायचे ते आधीच ठरवलेले असते. त्यात सहसा काही अल्प अपवाद वगळता त्यात कोणताही बदल होत नसतो. मात्र, समजून घेण्यासारखी महत्त्वाची बाब म्हणजे जास्त संख्येने उमेदवार असलेल्या एका गटाच्या जागेवरून एकच उमेदवार निवडून येत असल्याने बाकीच्या पराभूत उमेदवारांचा वेळ, काळ, पैसा आणि शारीरिक मेहनत ही नाहक खर्ची पडत असते. त्यामुळे आपली आर्थिक स्थिती, मानसिक क्षमता पाहूनच निवडणुकीच्या रणांगणात उतरणे सोयीचे असते. अन्यथा कर्ज काढून सण साजरा करून कर्जदार होण्याला कधीच समाजमान्यता मिळत नसते. अनेकदा निवडणूकीत उभे असणारे सारेच उमेदवार सक्षम वाटत असले तरी त्यातील एकाच्याच गळ्यात विजयाची माळ पडत असते आणि बाकी पराभूत उमेदवार मिळालेल्या व कमी पडलेल्या मतांची वजाबाकी करून स्वतःच्या मनाचे समाधान करून घेत असतात. एकूणच वेळोवेळी होणाऱ्या कोणत्याही निवडणूकांचा गांभीर्याने विचार केल्यास एका उमेदवारालाच समाधान मिळत असते, तर जास्त संख्येच्या उमेदवारांना झालेल्या पराभवाचा पश्चाताप सहन करावा लागतो. त्यामुळे पैशाचा अपव्यय, वेळ आणि शारीरिक मेहनत टाळण्यासाठी उमेदवारांनी आपल्याला सर्व बाबी झेपत असल्यासच निवडणुकीत भाग घ्यावा. कारण शक्यतेच्या भरवशावर विजयी होता येत नसते, तर त्यासाठी निश्चितता ओळखून पुढे जाणेच योग्य असते, तशी शक्यता वाटत नसल्यास माघार घेण्यात काहीही कमीपणा नसतो, जो पराभूत उमेदवारापेक्षा केव्हाही चांगला निर्णय समजावा. शेवटी जे कोणी सातारा लुटून पुण्याला दान करणारे धनसंपन्न उमेदवार असतात त्यांच्यावर निवडणूकीतील हार जीतीचा कोणताही परिणाम जाणवत नसतो. कारण ते निवडणूकीला एक जुगार समजून पुढे जात असतात आणि त्यांच्याकडून आज गेलेला पैसा परत आणण्यासाठी त्यांच्याकडे अनेक पर्याय उपलब्ध असतात. मात्र, सामान्य माणसांनी सर्व दृष्टीने विचार करूनच निर्णय घेण्याची गरज आहे. कारण राजकारण हा प्रांतच मुळात प्रामाणिक माणसांच्या अखत्यारीत राहीलेला नाही. उमेदवाराला उभे राहण्यास प्रोत्साहन देणारे आधिचे, कालचे सहकारी, मित्र, हितचिंतक, विश्वासू जेव्हा आपला उमेदवार पराभूत होतो. तेव्हा आपल्याला सोयीस्कर वेगळे ठेवत अनेक कारणे पुढे करून पराजय का व कसा झाला हे सांगण्याचा प्रयत्न करतात. त्याचवेळी पराभूत उमेदवाराचा वेळ, काळ, पैसा आणि शारीरिक मेहनत नाहक वाया गेलेली असते. अशांनी पुन्हा एकदा समजून घ्यावे की, कोणतीही निवडणूक जिंकणे म्हणजे तो चमत्कार समजू नये. त्यासाठी वेळेवर पाण्यासाठी विहीर खोदण्यासारखी स्थिती निर्माण करण्यापेक्षा जर भविष्यात खरेच आपल्याला ज्या निवडणूकीत हमखास विजयी होण्याची दुर्दम्य इच्छा आहे त्यासाठी आपल्याला आतापासूनच पुढच्या निवडणुकीपर्यंत आपल्यापरीने जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी पुढे यावे लागेल व सुखदुःखात सहभागी होत राहावे लागेल. कारण निवडणूक जिंकणे म्हणजे झट मंगणी पट शादी असे होत नसते. त्यासाठी सामान्य माणसांनी राजकारण समजून घ्यावे पण खऱ्याअर्थाने जनादेश समजून न घेता आणि पुरेसा धनादेश नसतांना कोणत्याही परिस्थितीत उमेदवार म्हणून निवडणूक लढवू नये. कारण बदललेल्या राजकारणात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा जनमाणसावर पडल्याचा पुर्णपणे विश्वास आल्याची खात्री झाल्याशिवाय उमेदवार म्हणून कुणी निवडणूक लढवू नये. कारण आजच्या गलिच्छ, नितिभ्रष्ट, विश्वासघातकी, भ्रष्टाचाराने वेढलेल्या आणि गुंडगिरी, झुंडशाहीने पछाडलेल्या राजकारणापासून सुज्ञ माणसांनी अलिप्त राहणेच त्यांच्या हिताचे आहे व पुढेही असेल एवढेच! ■ ■







रतन तायडे
94201 25761

## कलाकार

ऊमेदवारांचा प्रचार
जोर सुरू आहे
लष्करीतील घोषणा
म्हणजे वाऱ्यावरची वरात
अमुक करू, ढमुक करू
राज्यांचा भडिमार
चारित्र्याची महती सांगतो
जाहिरात चिमार
जमेल तुमच्या काणा
पाया पडतांना वाकवतो
गावातील कुरव्यात गुंड
किती विनम्रता शोधतो ?
ही अशी नाटके
प्रश्नो ज्याला त्याला
कोणत्या विद्यापिठ शिकतात
पुढे ह्या सर्व कला ?

**ईशारा**

`घड्या' ही आजकाल
गजर `तुतारी'चा करत आहे
`काका' फिरवतात
`पुतण्या' चावी भरत आहे
`दादा'गीरीने वैतागला
`कमळा'चा `परिवार'
देव म्हणाला पेलवत नाही
आता फुलांचा भार
`पिंपरी'ला म्हणाले `चिंचवड'
`खडक'ची वाट आहे.
कोण कोणाला शोधणार
कात्रजचा घाट ?
विश्लेषण, प्रत्यारोपांचे
मैदानात जुंपले रण
अजून म्हणाले
`न्यायप्रविष्ट' आहे `प्रकरण'

**धांगधिंगा**

शांतीतील वातावरण
सांगा सातारा आहे?
शर्मने मान खाली घालतो

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

हा धिंगाणा बघून तमाशाचा फड
तो जिभेवर नियंत्रण
तुम्ही जरा
तुमची बेताल नावे
आमचा कलगीतुरा बरा
कोणाची कानात
अन् नसतो कुणाचा बांबू
आमच्याच टेकुवर ऊभा
आमचाच तंबु असतो
नितिमत्ता घसरवत
प्रभाव तुम्हाचे ओसरले
काय सावरतां टोप्या, फेटे
जेव्हा खालीचेच घसरले

**नमन**

आम्हाला तर आजपर्यंत
असा नेता भेटला नाही
ज्याच्या घोषणा
नियमही कोणता खटला नाही
ऊल्ट पार्टीत ज्याचा
जेवढा मोठा वाटा असेल
विशिष्ट प्रभावशाली असतो
तिकीट त्याचा बायोडाटा
पटत कोणाला तर
हे रेकॉर्ड चेक करा
बघा सर्व कलम आटवले
नग आवडतील एक नावे
आजकाल निर्णयात
हे सर्व कॉमन आहे
पण ह्याला जे अपवाद आहेत
त्यांना आमचे नमन आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# क्रांतीज्योती आणि मकरसंक्रांत

मकर संक्रांतीचे दिवस सुरू आहेत. हलव्याचे दागिने, नवीन सुनेचा तिळवा, बाळाचे बोरन्हाण किंवा लूट, काळ्या साड्या, एकमेकींना वाण देणे, घरी हळदी कुंकू करणे आणि तिळगुळ घ्या गोड गोड बोला. या दिवसात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हमखास आठवतात. हो, क्रांतीज्योती सावित्रीबाईच्या जीवनातील एक प्रसंग मकर-संक्रांतीशी जुळलेला आहे.



सावित्रीबाईंनी स्त्रियांना एकत्र करून त्यावेळी एक मंडळ स्थापन केले होते. त्याचे नाव 'महिला सेवा मंडळ' होते. सूतकताईपासून हळदी कुंकवापर्यंत अनेक उपक्रम या मंडळातर्फे त्या घ्यायच्या. त्यांच्या हळदी-कुंकू कार्यक्रमाची आमंत्रण पत्रिका खूपच बोलकी आहे. 'तारीख 13/12/1852 रोजी पुणे कलेक्टरांच्या पत्नी मिसेस जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक तिळगुळ व स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होणार आहे. तसे सर्व स्त्रियांनी आपल्या लेकी सुनांना घेऊन यावे. समारंभ संध्याकाळी पाच वाजता आहे. कोणत्याही जातीच्या अगर धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातीभेद व पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरुन हळदीकुंकू लावण्यात येईल आणि तिळगुळ वाटप करण्यात येईल.'

सौ. सावित्रीबाई भ्र.जोतीराव फुले, सेक्रेटरीण, महिला सेवा मंडळ. या पत्रिकेतील 'कोणत्याही जाती-धर्माच्या बायका एकाच जाजमावर बसतील' हा विचार फार महत्त्वाचा आहे. आजच्या जातिभेदाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई पुन्हा पुन्हा आठवत राहतात. हा समारंभ एवढ्या मोठ्या प्रमाणात होता की या समारंभासाठी तीन पोते तीळ आणि एक पोते गुळ लागल्याचा उल्लेख आहे. पारंपरिक सणांमधून पण आपल्याला सामाजिक परिवर्तनाचा संदेश देता येतो हे सावित्रीबाईंनी त्याकाळी समाजाला दाखवून दिले होते. आजही हळदीकुंकू समारंभातून विधवा स्त्रियांना वगळून त्यांच्या मनावर जो ओरखडा उमटवला जातो ती गोष्ट तर अमानवीय वाटल्यावाचून राहत नाही. या संदर्भातील माझ्या एका मैत्रिणीचे विधान





आठवत राहते. 'पती निधनाचे दुःख वेगळे आणि या चालीरीतींचे ओरखडे वेगळे. संक्रांतीचे दिवस आले की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. मी फार मोठा गुन्हा केला आहे असे उगाचच वाटायला लागते.' यावरून जाती-धर्म, सधवा-विधवा यापलीकडे जाऊन माणूसपणाचा विचार अशा सणानिमित्ताने व्हायला हवा असे वाटते. थोडाफार बदल होतोय. आता बाई, बाईला समजून घ्यायला लागली आहे. भगिनीभाव वाढतो आहे. सावित्रीआईंचे चरित्र वाचून तर तो वाढायलाच पाहिजे. तो बदल अगदी स्वागतार्ह आहे. खरेतर विधवा, परित्यक्ता, हे शब्दकोशातील शब्द मनावर ओरखडे उमटवणारे आहेत. तिचा नवरा निघून गेला यात तिचा दोष असतोच कुठे? पण तरीसुद्धा तिला दुजाभावाची वागणूक समाज आजही देतो. अशावेळी माणूस म्हणून विचार करणाऱ्या सावित्रीबाई मात्र पुन्हा पुन्हा आठवत



डॉ. लीना निकम
9881669345

# दर्पणकार बाळकृष्ण जांभेकर यांच्या स्मृतीस....

जांभेकर खरेतर प्राध्यापक होते. पण सामाजिक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. ज्या काळात देशात उच्चनिचता पाळली जात होती, त्याकाळात जांभेकर पुरोगामी विचार करत होते. 6 जानेवारी 1812 रोजी कोकणात कुडाळ येथे जन्मलेले जांभेकर यांच्या कार्यविषयी आचार्य अत्रे यांनी मराठामध्ये मुक्तकंठाने गौरव केला आहे. कमी वयात ते प्राध्यापक झाले. दर्पण पाक्षिक सुरु केले खरे पण त्यासाठी त्यांना आयुष्य फार कमी लाभले. वयाच्या अवघ्या 34 व्या वर्षी म्हणजे 17 मे 1846 रोजी त्यांचे निधन झाले. बाळ गंगाधर टिळकांचे निधन झाले त्यावेळी जांभेकर 8 वर्षांचे होते. ते कॉलेजच्या पहिल्या वर्षात गेले, त्यावेळी राष्ट्रपिता जोतीबा फुले यांचा जन्म झाला. अर्थात जोतिबांच्या जन्माच्या वेळी जांभेकर 17 वर्षाचे होते! तथापि कोकणातील खोतीपद्धतीचे जांभेकर यांनी कधीच समर्थन केले नाही. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक अन्यायाविरोधात लढता येते यांची जाणीव त्यांना होती. मात्र 18 व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि 19 व्या शतकाच्या पूर्वार्धात सुरु झालेल्या सामाजिक सुधारणापर्वातील सुधारकांच्या विचारांना गतिमान करण्याची संधी तथा वेळ मिळाला नाही. ते कार्य पुढे शिवराम जानबा कांबळे आणि जोतीबा फुले यांनी केले. फुले म्हणजे झंझावात. ज्यापुढे इतर सारे सुधारक झाकोळले! सामाजिक सुधारणेसाठी, शूद्र-अस्पृश्याच्या न्यायाच्या लढाईचा हा संघर्ष तथागत गौतम बुद्ध यांच्यापासून सुरु झालेला आहे, जो पुढे सत्यशोधक चळवळीने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र सत्यशोधक समाजाच्या क्रांतीला जोतिबाच्या निर्वाणानंतर मर्यादा पडल्या. 1885 साली स्थापन





झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये अनेक सत्यशोधक एकेक करत सामील झाले, जसे वर्तमानातील राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, नगरसेवक, आमदार, खासदार भाजपमध्ये प्रवेश करीत आहेत. जोतिबांचा हा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1920 च्या प्रारंभात मूकनायक (31जानेवारी 1920) सुरु करून पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पुढील इतिहास आपल्या सर्वानाच ज्ञात आहे. म्हणूनच पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते राष्ट्रपिता जोतीबा फुले यांचा जयंतीदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याची मागणी करत असतात! मात्र पत्रकारितेचा भारतात पाया घालण्याचा मान जांभेकर यांनाच जातो, जे आधी मराठी व्यक्ती होते! त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन! ■ ■

गुणाजी काजिर्डेकर
मो. 9323632320

प्रवासवर्णन...

# सुट्टीतील आनंददायी पर्यटन...

पुण्यात माझी अगदी जिवलग, जवळची मैत्रिण असते संपदा. बऱ्याचदा आमचे फोनवर बोलणे सुरू असते. मी पुण्याला सान्वीला घेऊन एकदातरी यावे असा सारखा तिचा अट्टाहास असायचा. माझे डी.एड. पुण्याला झाले, त्यामुळे पुणे हे शहर अगदी माझ्या मनात घर करून बसलेले. अगदी शांत वातावरण, बहुतांश ठिकाणी माझी मायबोली, माझ्या काळजाशी घट्ट नाळ जुळलेली, माझी मराठी कानावर पडली की खूप हर्ष वाटतो, अभिमानही वाटतो, माझ्या महाराष्ट्राचा. दोघींच्या आग्रहापोटी पुण्याला जायचे ठरले. मग काय झाली तयारी. रात्री उशिरापर्यंत पॅकिंग केली, थंडीचे दिवस असल्यामुळे गरम कपडे सुद्धा सोबत घेतले. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून सर्व कामे आटपून सकाळी 9.00 वा. घरून निघालो. 10.00 ला बर्डी नागपूर रेल्वे स्टेशन गाठले. आमची ट्रेन 10.40 ला प्लॅटफॉर्म नंबर पाच वर येणार होती. आझाद हिंद एक्सप्रेसचे रिझर्वेशन न मिळाल्यामुळे महाराष्ट्र एक्सप्रे ने जायचे ठरले.

**ट्रेनमधला अनुभव :-** पाच मिनिटात ट्रेन आली. आम्ही ट्रेनमध्ये चढलो. रिझर्वेशन कन्फर्म मिळाले नव्हते. वेटींग रिझर्वेशन असूनही आम्हाला एका महिलेने तिच्या कन्फर्म असलेल्या सीटवर बसण्यास जागा दिली. मीही तिला धन्यवाद म्हटले. ती महिला तिच्या 5 वर्षाच्या मुलासोबत दौंडला माहेरी चालली होती. 'कुठे चाललात तुम्ही? ती महिला उद्गारली'! पुण्याला, मी म्हणाले. 'मी शालिनी, तुमचे नाव काय?' मी त्या महिलेला विचारले. विभावरी, सगळे विभा च म्हणतात मला आणि हा माझा मितांश, AI app वर इंग्रजी बोलत असलेल्या 5 वर्षाच्या आपल्या मुलाला जवळ घेत विभा बोलली. मितांश खूपच प्रभावी इंग्रजी बोलत होता. सान्वी .. माझी 7 वर्षाची मुलगी त्याचे निरीक्षण करित होती. आमच्या औपचारिक गप्पा झाल्या. सान्वी ने विनंती केली आणि मितांश ने तिला लगेच विंडो सीट जवळ बसू दिले. खूप चांगली कंपनी आम्हाला प्रवासात मिळाली होती. विभा चे स्टेशन आले आणि ती मितांश सह उतरली. मध्यरात्रीचे साडेतीन वाजले होते.

मी विभाला तिची बॅग उतरविण्यास मदत केली. आयुष्याच्या या प्रवासात कुठलेही रक्ताचे नाते नसताना माझ्यावर परोपकार करणारी विभा मला विलक्षण वाटली. पेशाने डॉक्टर होती पण कसलाही अहंभाव तिच्या स्वभावात कुठेही जाणवला नाही.

**पुण्यातील मज्जा :-** पुढच्या दिड तासात पुणे स्टेशन आले, संपदा घ्यायला आली होती, पुण्यातील हडपसर परिसरात ती रहायला होती, संपदाचा नवरा अनुज प्राध्यापक होता आणि स्वभावाने पण खूप छान. त्यांनी सान्वी चे खूप लाड केलेत. शाळेला हिवाळी सुट्टी असल्यामुळे आमचा पाच सहा दिवस पुण्यात मुक्काम होता.

एक दोन दिवस तर आमचे नुसते गप्पा मारण्यातच गेले. कधी रात्र संपून दिवस उजाडत होता कळतच नव्हते. आमच्या मुक्कामातले उर्वरित दिवस छान कुठेतरी फिरायला जायचे आमचे ठरले.

**प्रवासाचा श्रीगणेशा :-** आमच्या प्रवासाचा श्रीगणेशा आम्ही श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापासून केला. मंदिरात त्यावेळी फारशी गर्दी नव्हती. ती गणेशोत्सवात विशेषतः बघायला मिळते. 'प्रसिद्ध मिठाई व्यापारी श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांनी 1893 मध्ये गणपती मूर्तीची स्थापना केली. तसेच मा. मुख्यमंत्री ते अनेक नामवंत लोक लाखोंच्या संख्येत इथे दर्शनाला येतात. अनुज, सान्वी आणि गिरिजा दोघींनाही माहिती सांगत होता. गिरिजा नऊ वर्षांची होती. तिच्या जन्माच्या वेळी मी आले होते पुण्याला, संपदा डिलिवरी साठी खेडला तिच्या माहेरी आली होती तेव्हा.





पुणे हे ऐतिहासिक संस्कृती असलेले, शिक्षणाचे माहेरघर, इथले जोशी वडापाववाले तर खूपच प्रसिद्ध. अहाहा! काय चव ती, त्या वडापाव ची. दगडूशेठ गणपती दर्शन झाल्यानंतर आम्ही वडापावचा आस्वाद घेतला आणि मन तृप्त झाले. त्यानंतर आम्ही शनिवारवाडा बघण्यासाठी गेलो. असे म्हणतात 22 जानेवारी 1732 रोजी या वाड्याची वास्तुशांती शनिवार या दिवशीच झाली होती म्हणून शनिवारवाडा हे नाव पडले. प्रशस्त असा शनिवारवाडा कोपरा नि कोपरा आम्ही न्याहाळून काढला, त्यात सान्वीचे नाना प्रश्न. विविध देशातील पर्यटक इथे भेट देण्यास येतात. ऐतिहासिक संस्कृती लाभलेली ही वास्तू आपला वारसा आहे. हा वाडा पूर्वी पेशव्यांचे निवासस्थान होता, त्यांच्या घरातील मुलामुलींची लग्ने याच वाड्यात व्हायची. शनिवार वाडा बघता बघता कधी पाच वाजले आम्हाला कळलेच नाही. त्यानंतर आम्ही तुळशीबागेत गेलो. नावाप्रमाणे ही काही बाग नाही बरे का, तुळशीबाग हे एक पुण्यातील खरेदी करण्याचे, खाण्यापिण्याच्या नाना वस्तू मिळण्याचे सर्वांना आवडेल असे ठिकाण. त्याचबरोबर तुळशीबागेचा गणपती यासाठी प्रसिद्ध आहे. जवळपास एक दोन तास आम्ही तुळशीबागेत मनसोक्त उंडारलो, लेकरांच्या अट्टाहासापोटी फक्त एकदाच म्हणून त्यांना पाणीपुरी, खाऊ घातली. सायंकाळचे सात वाजले होते. संपदाकडे घरी पोहोचलो, संपदाला स्वयंपाकात मदत करू लागले, अनुजने पनीर आणले होते, संपदाने झणझणीत मटर पनीर बनविले होते. कधीही तिखट न खाणारी सान्वी संपदा मावशीची स्तुती करत होती. जेवणं आटोपली आणि दुसऱ्या दिवशी कोकण प्रवास करायचे ठरले.

**कोकणातील सफर :-** पहाटे 4 वाजता आम्ही उठलो. सर्वांच्या अंघोळी, आटोपून तयारी करून आम्ही निघालो ताम्हिणी घाट, हरिरेश्वर, पालीचा गणपती, काशीद बीच पाहण्याचे आमचे नियोजन होते. सकाळी 9.00 वाजता आम्ही ताम्हिणी घाट गाठले. बेडशिटस, जेवणाचे डबे आम्ही सोबतच घेतले होते. ताम्हिणी घाट हा पुणे जिल्यातील सह्याद्री डोंगरातील परिसरात येतो. डिसेंबर महिना असल्यामुळे हिरवाई थोडी रुसून बसली होती आणि आपली आसवे झाडांच्या पानांवर, गवतावर मोत्यासारखी गाळत होती. धुक्याची तर वेगळीच मज्जा होती. सकाळचे अधून मधून येणारे उन्ह, काश्मीर मधल्या बर्फासारखे पांढरे शुभ्र धूके आणि प्रफुल्लित वातावरण, मला तर माझ्याच काव्यपंक्ती आठवल्या,

मनात माझ्या, नभात माझ्या
दाट धुके चहुकडे
वाट मोकळी श्वास मोकळा
तरी दिसें ना ऊन कोवळे
दवात मोती, ढगात गाती
सूर गुलाबी कडेकपारी
मंद वारा गार शहारा
हवाहवासा ऋतू निराळा

अगदी प्रफुल्लित वातावरण होते. आम्ही रस्त्याच्या कडेला गाडी थांबवली, मोकळी जागा शोधून चटई अंथरली, पिल्लांना भूक लागली होती.

चहुकडे, लोचनी भुरळ पडावी असे मनोहर दृश्य होते. त्या क्षणांना आम्ही कॅमेऱ्यात कैद केले. सेल्फी, फोटो, खूप खजिना आम्ही जतन करत होतो. नाश्ता आटोपून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. त्यानंतर ड्रायवरला लोकेशन लावण्यास सांगितले आणि आम्ही निघालो. सोबतीला आमची लहान पिल्लं असल्यामुळे त्यांचे लघु प्रॉब्लेम ही प्रवासात आलेत आणि आनंदाने पार पडलेत. हरिहरेश्वर गाठले, रायगड जिल्यातील दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणारे हे ठिकाण समुद्रकिनारी वसलेले आहे. भगवान शिवसमर्पित श्री हरहरेश्वर मंदिर आम्ही गाठले. मंदिराला लागूनच शांत आणि स्वच्छ अरबी समुद्रकिनारा आहे. आम्ही मंदिराचे दर्शन घेतले आणि समुद्रकिनारी गेलो. आमचे फोटोसेशन झाले, किती लोभस वाटत होता

तो समुद्र, सगळीकडे पाणीच पाणी आणि किनाऱ्याच्या बेभान ओढीने धावत येणाऱ्या त्या लाटा. पुन्हा मनात ती स्फुरली.

लांब लांब किनाऱ्यावर
उसळत येतात हजार लाटा
किनाऱ्याच्या बेभान ओढीने
शोधत येतात कैक वाटा
गार गार वारा हळूच
फिरत राहतो गर गर
फेसाळलेले जलही मग
तरंगू लागते वर वर
वाळूमध्ये अलवार बोटं
गिरवू लागतात क्षणात नाव
अलगद एक लाट येऊनी
पुसूनी जाते अस्तित्वाचं गाव
निळ्या जांभळ्या नभात दडतो
सायंकाळी हा भास्कर
मनही वेडे धुंद होते
हरवूनी जाते पुन्हा क्षणभर



शालिनी सोमकुवर
मो. 7757803625

संपदा आणि अनुज माझी अगदी त्या क्षणाला भिडलेली कविता ऐकून भारावून गेले होते. मी कविता करते हे अनुजला पहिल्यांदा कळले होते. संपदा तर कायम मला कवितेसाठी प्रोत्साहन द्यायला तत्पर असायची. तिचे प्रोत्साहन इथेच न संपता मी काव्यसंग्रह काढावा आणि तिने समीक्षण करावे इथेपर्यंत येऊन ठेपले होते. प्रवास पुढे सुरु झाला, सायंकाळचे साडे पाच वाजले होते.

सूर्य मावळतीला निघाला होता. आता काशीद बीच चे वेड लागले होते. शेवटी पोहोचलो. तो लांब लांब किनारा बघून पुन्हा मन हरवून गेले. सान्वी आणि गिरिजा दोघींनाही बोटिंग करण्याची खूप उत्सुकता होती आणि आम्ही तिघांनीही पुढाकार घेतला बोट किनाऱ्यावर आली, बसण्यासाठी लोकांची गर्दी होती, माझे लक्ष समुद्राच्या खोलीकडे गेले. किती खोल असेल बरे हा समुद, सगळीकडे पाणीच पाणी आणि थेट मी भूगोलात जाऊन शिरले. सर्वजण बोटमध्ये चढले सान्वीचा संपदाने आणि गिरिजाचा अनुजने हात घट्ट पकडला होता आणि मी सर्वात शेवटी असल्यामुळे सर्वांच्या शेवटी चढले.

**समुद्रातील आनंद आणि थोडी भीतीही :-** बोट सुरू झाली होती, तिचा वेग वाढला होता, मी बोटच्या काठावर उभी होते, एक धिप्पाड साधारण पाच फूट उंची, सावळा वर्ण असलेली चाळीशीतल्या वयातली महिला पुढे सरकण्याच्या भानगडीत मला जोरदार धक्का देऊन गेली आणि मी थोडी घाबरले, भीतीमुळे कारण बोटमधे बसण्याची माझी पहिलीच वेळ होती तेही एवढ्या विशाल सागरात. नागपूर ते पुणे प्रवास आनंदासाठी, सान्वी साठी, पर्यटनासाठी होता. आम्ही बोटमधून उतरलो. रात्र झाली होती. आम्हाला सात वाजले होते, समुद्रही काळकुट्ट दिसू लागला होता. उजेड दिसत होता तो फक्त बोटींवरील लाईट चा.

**परतीचा प्रवास :-** अजून तो प्रसंग माझ्या डोक्यातून निघत नव्हता. कसेबसे स्वतःच्या मनाला सावरले आणि आणि आम्ही परतीचा प्रवास सुरू केला. परत येता येता रायगड जिल्ह्यातील पाली गणपती मंदिरात धावती भेट दिली. पाली हे रायगड जिल्ह्यातील गाव असून येथील गणपती मंदिर अष्टविनायकांपैकी एक आहे आणि बल्लाळ या भक्ताच्या नावावरून या मंदिराला बल्लाळेश्वर मंदिर नाव पडले. असा आमच्या प्रवासाचा श्रीगणेशा बाप्पापासूनच झाला आणि शेवटही. रस्त्यात एका फॅमिली रेस्टॉरंटमध्ये गाडी थांबवून आम्ही रात्रीचे जेवण केले. साधारण रात्रीचा एक वाजला होता. सान्वी आणि गिरिजा गाडीमध्येच गाढ झोपी गेल्या होत्या.

आम्ही संपदाकडे घरी पोहोचलो. सगळं आवरून संपदा आणि मीही काही वेळ गप्पा मारून झोपी गेलो. दुसरा दिवस आम्ही छान खाण्यापिण्यात घालविला आणि घरीच आराम केला. त्याच दिवशी रात्री आमचे नागपूरला परत येण्याचे रिझर्व्हेशन होते. गिरिजा आणि सान्वीची छान गट्टी जमली होती. संपदा आणि अनुज दोघेही स्टेशनवर सोडवायला आले होते. संपादाशी 18 वर्षानंतर ही भेट घडली होती आणि आमच्या कोकण पर्यटनात ती अजूनच अविस्मरणीय झाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी 10 ला नागपुरात पोहोचलो, बाबा घ्यायला आले होते. घरी पोहोचलो, प्रवासाचा थकवा वाटत असल्यामुळे लवकर झोपी गेलो. आठवतो स्वप्नात कधीकधी तो समुद्र आणि मी करते त्याच्याशी हितगुज सकारात्मक. ■ ■



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -६०

## बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा वैशाली नगर, नागपूर.

तथागत बुद्ध विहार, विपश्यना केंद्र, वैशाली नगर, नागपूर, येथील पुतळा स्मृतीशेष जांभूळकर आई यांनी दानात दिला आहे. दि.14 एप्रिल 2019 ला. भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या हस्ते अनावरण झाले.

संवाद मित्र, डी.ए. राऊत
वैशाली नगर नागपूर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापाठ नामांतर दिनी शहीदांना मानवंदना

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर दिनानिमित्त सहयोग मित्र परिवार संस्था, उत्तर नागपूर विकास आघाडी, समता सैनिक दल, समाज समता मंच व उत्तर नागपूर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संयुक्त विद्यमाने इंदोरा 10 नंबर पूल येथील नामांतर शहीद स्मारकावर नामांतर चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते अनिल वासनिक, भदंत नागदीपांकर, राजकुमार वंजारी, रामभाऊ डोंगरे, भीमराव वैद्य, रिपाइं नेते डी. एम. बेलेकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून शहिदांना विनम्र अभिवादन केले.



सर्वप्रथम इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला भदंत नाग दीपांकर, अनिल वासनिक, रामभाऊ डोंगरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस सुनिता ढवळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व जयभीम सलामी दिली. त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी नामांतर शहीद स्मारकावर जाऊन अभिवादन करून शहिदांना जयभीम सलामी दिली. यावेळी अभिवादन सभेत भदंन्त नागदीपांकर, अनिल वासनिक यांनी विचार मांडले. संचालन लहानू बन्सोड यांनी केले. या प्रसंगी रमेश ढवळे, राजेंद्र टेंभुर्णे, प्रकाश मोटघरे, अनिल बावनगडे, चित्तरंजन चवरे, नरेश महाजन, देवानंद बडगे, मनोहर दुपारे, निरंजन वारकर, गोपीचंद अंभोरे, अरूण गायकवाड, कमलेश सहारे, सुनीता ढवळे, रजनी वंजारी, शीला डोंगरे, डाली सरदारे, नरेश बागडे, श्रीकांत सांगोळे, विजय नागदीवे, एस. जी. मंडपे, ज्ञानेश्वर मंडपपे, शीतल पानतावणे, माधुरी मेश्राम, अशोक खोब्रागडे, भूमी वनदुधे, अर्चना बन्सोड, तन्वी अलोने, गीता खोब्रागडे, रोषणी सरदारे, दीक्षा खोब्रागडे, किशोर अलोणे, सुबोध सरदारे, राहुल ढवळे, तुलाराम मेश्राम, लक्की उके, हेमराज बागडे, चैतन्य मनोहरकर, सिद्धार्थ जवादे, चंद्रशेखर मेश्राम यांच्यासह मोठ्या संख्येत कार्यकर्ते उपस्थित होते.

### नामांतर दिवस इतिहास ...

मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळात 27 जुलै 1978 रोजी एकमताने मंजूर झाल्यानंतरही त्याची अंमलबजावणी सरकारने केली नाही. त्यामुळे नामांतर ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आंबेडकरी संघटना व पुरोगामी शक्तिंना 16 वर्षे संघर्ष करावा लागला. नागपुरातील आंदोलकांवर पोलिसांनी दोन वेळा केलेल्या गोळीबारात 9 भीमसैनिक शहीद झाले. अनेकांचे बलिदान व भीमसैनिकांच्या अविरत आंदोलनामुळे अखेर सरकारला 14 जानेवारी 1994 रोजी नामांतराची अंमलबजावणी करावी लागली. तेव्हापासून 14 जानेवारी हा नामांतर दिवस पाळला जातो.

# भारताचे संविधान हे परिवर्तनशील व लोककल्याणकारी दस्तऐवज : न्या. भूषण गवई



**नागपूर :** भारतीय संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून ते समाजातील बदल, संघर्ष व लोकांच्या अपेक्षांना सामोरे जाणारे काळानुरूप बदलणारे जिवंत दस्तऐवज आहे, असे प्रतिपादन देशाचे माजी सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांनी केले. ते मारवाडी फाउंडेशन आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

यावेळी नागपुरातील ज्येष्ठ न्यूरोलॉजिस्ट पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेघाम यांना फाउंडेशनतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना डॉ. मेघाम यांनी, 'डॉ. बाबासाहेबांच्या नावाने मिळणारा सन्मान हा माझ्या वैद्यकीय व सामाजिक कार्यातील सर्वोच्च सन्मान आहे,' अशी भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती अनिल किलोर, माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, विजय डागा, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मारवाडी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभा केलेला समता, बंधुता व न्यायाचा विचार आजही समाजासाठी मार्गदर्शक आहे. अशा विचारांवर चालणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे हे फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे.' कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. उपस्थित नागरिक व मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करत सामाजिक जाणीव जपणाऱ्या अशा कार्यक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

## महत्वाचे

### दबलेल्या आवाजाला बुलंद करणाऱ्या नेतृत्वाला पाठबळ द्या : प्रा. पवन गजभिये

**नागपूर :** नागपुरच्या विकासासाठी ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाला पाठबळ देण्याकरिता, चळवळ गतिमान, संघर्षशील, सामाजिक न्याय व स्वाभिमानाने जगण्याकरिता, प्रतिनिधित्वाची हमी, दबलेल्या आजावाना बुलंद करण्याकरिता, वंचित आघाडी म्हणजे परिवर्तनाला सुरुवात, वंचित बहुजन आघाडी म्हणजे भविष्य वंचित बहुजन आघाडीला प्रचंड प्रमाणात मतदान करून निवडून देण्याचे आवाहन प्रा. पवन गजभिये जेष्ठ नेता वंचित बहुजन आघाडी यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

### मानोरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन



**नागपूर :** मानोरा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन झाले. कार्यक्रमास बी.डी.ओ. डॉ. जाधव आवर्जून उपस्थित होते. सरपंच नंदकिशोर तावडे यांच्या नेतृत्वात ग्रामसेवक विजय मेश्राम शाळेचे मुख्याध्यापक ठाकरे यांनी कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन केले. प्रा. डॉ. मुकुंद गोपाळराव मेश्राम यांनी गावातील विद्यार्थ्यांना अभ्यासास सोयीचे व्हावे. म्हणून आपले घर वाचनालयासाठी दिले. तसेच सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. स्वतः बीडीओनी त्यांचा सत्कार केला. प्रवीण वासनिक, मिथुन माते, पुणेश्वर मोटघरे, पंजाबराव ठाकरे इ. उपस्थित होते.

### एच.ओ. ठाकरे यांचे कार्य कौतुकास्पद !




**नागपूर :** इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्सचे प्रमुख पदाधिकारी आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. एच.ओ. ठाकरे यांचे कार्य अतुलनीय होते. त्यांची दूरदृष्टी, नेतृत्वक्षमता आणि कार्याप्रती असलेला समर्पण भाव फार महत्त्वपूर्ण होता. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रासाठी केलेले कार्य नागपूरकरांच्या हृदयात चिरकाळ स्मरणात राहावे, या हेतूने पहिला एच. ओ. ठाकरे स्मृती पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीसाठी कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर तर औद्योगिक विभागाकरिता डॉ. रमेश दर्यापूरकर यांना इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनीअर्सच्या वतीने प्रदान करण्यात आला. हा सोहळा मंगळवार 13 जानेवारी रोजी पार पडला. याप्रसंगी झालेल्या सोहळ्यात व्हाईस ॲडमिरल के. ओ. ठाकरे, विजय कांबळे, डॉ. संदीप शिरखेडकर, डॉ. उदय वाघे, डॉ. दिलीप मसे, सतीश रायपुरे, मिलिंद पाठक, डॉ. वाल्सन वर्गीस, प्रकाश कुळकर्णी, जयंत जोशी, डॉ. महेश शुक्ला यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# समता सैनिक दलचे वार्षिक प्रशिक्षण शिबिर

### जयभीम जनक बाबू हरदास एल.एन समाधी कन्हान नदी काठावर



**कामठी :** जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल एन स्मृती समिती समता सैनिक दल यांच्या संयुक्त विद्यमान 1986 पासुन हरदास स्मृती स्मारक स्मृतीभुमी हरदास घाट कन्हान नदी काठावर समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येते 1940 पासून उपरोक्त स्थळी पुर्वोत्तर काळात हरदास मेळावा निमित्त आयोजन व्हायचे आता मागील पस्तीस वर्षापासून हे अभियान सुरू आहे जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल एन स्मृती पंधरवडा अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र मध्ये विविध ठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. वर्तमान विषम काळात डॉ. आंबेडकर चळवळीची होत असलेली वाताहत थांबवण्यासाठी बाबु हरदास एल एन आणि समकालीन कार्यकर्ते यांचे योगदान मोलाचे आहे. वर्तमान समाज घटकांनी अवलोकन करून बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात आले या वार्षिक शिबिरातून होणार आहे असे भदंत नागदिपंकर यांनी सांगितले आहे.

# परिवर्तन साहित्य संमेलन यशस्वी करु : डॉ. महेंद्र पाटील

**नागपूर :** पुस्तके आमचे मित्र आहेत. आम्ही पुस्तके वाचत होतो पण पुन्हा नव्या पिढीला वाचनाची आवड नवीन निर्माण झाली पाहिजे. याकरिता साहित्य संमेलन गाव पातळीवर जिथे शक्य होईल अश्या परिसरात साहित्य संमेलन झाली पाहिजे तर सामाजिक बांधिलकी निर्माण होईल. बौद्ध साहित्याचे अभ्यासक डॉ. भदंत धम्मदीप यांचे दिघोरी येथे वास्तव्य होते ही आठवण होते तर रतनसुत बौद्ध विहार जुनी दिघोरी परिसरात साहित्य संमेलन होत असून समता सेवा संघाचे पदाधिकारी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी मदत करतील असे डॉ. महेंद्र पाटील यांनी सांगितले. संमेलनाच्या संदर्भात विविध बाबीवर विस्तारपूर्वक विचार मनोज गजभिये यांनी व्यक्त केले. उपस्थित सर्वांनी विहारात होत असलेल्या साहित्य संमेलना संदर्भात आनंद व्यक्त केला. याप्रसंगी आयोजन समितीचे सदस्य प्रा. डॉ. दीपक बनसोड यांनी डॉ. महेंद्र पाटील यांचे स्वागत केले तर प्रा. प्रीती तिरपुडे आणि ज्योत्स्ना बनसोड यांनी मनोज गजभिये यांचे स्वागत केले. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. दुसरे परिवर्तन साहित्य संमेलन संदर्भातील सर्व माहिती विलास गजभिये यांनी दिली. बैठकीला युवराज गजभिये, शुद्धोधन लोखंडे, मुकेश ढोक, वासुदेवराव फुलझेले, विजय बोरकर, रविकर गायकवाड, विठोबा देशपांडे, रमेश पांडे आदी उपस्थित होते.



सीआयसीआरचे सेवानिवृत्त अधिकारी डॉ. सिद्धार्थ वासनिक हे दैनिक बहुजन सौरभचे भागधारक आणि संचालक झाले आहेत. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी शुभांगी सिद्धार्थ वासनिक होत्या. त्यांचे स्वागत आणि अभिनंदन करतांना कार्यकारी संपादक विलास गजभिये.

# योग नृत्य परीवारातर्फे मतदान जनजागृती रॅली




**नागपूर :** योग नृत्य परिवार चिटणीसनगर तर्फे प्रभाग 28, मध्ये मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. चिटणीस नगर परिवारा तर्फे नियमित समाजासाठी अभिनव व स्तूत्य उपक्रम हाती घेतले जातात. मतदान जनजागृती रॅलीमध्ये 100ते 125 महिला पुरुषांचा सहभाग होता. परीवारातर्फे प्रथम चिटणीस नगर बगीचामध्ये फलक आणि बॅनर हातात घेऊन, मतदान आणि लोकशाही, संविधान मुल्यांचा प्रचार प्रसार नितीन बर्गे, मोरेश्वर दुरुगकर यांनी नाट्यमय पद्धतीने साजरा केला. पथनाट्याच्या स्वरूपात निवडणूक प्रक्रिया जमलेल्या आणि येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना सांगितली, योग नृत्य परीवारातर्फे या कार्यक्रमाच्या सफल आयोजनासाठी अनेकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत करुन यशस्वी केला. या यशस्वितेसाठी शरद वानखेडे, महेश बानते, गिरीश निमकर, सागर राऊत, रोशन गोतमारे, शिंदे, मनोज दलाल, आतिलकर शंकर मौर्य, मनोज कुंभारे, दिलीप कोचे, सचिन तिडके, गजानन कांबळे, सौरभ राऊत, सुशांत राऊत, राकेश सदोकर, तीरथ ढोक, सुनील खानोरकर, घोडे, निर्वाण, भूषण काथोटे, राजेंद्र करंडे, राजेंद्र काकडे, दीपक समर्थ, अजय बालपांडे, ममता मते, अंजली आतीलकर, अमित मुरडिया, विनोद श्रीवास्तव, भुरे, वैद्य, समर्थ, मनोज कुंभारे विजय पावणेकर, चंदा राऊत, दुर्गे आणि योग नृत्य परिवारातील सर्व महिला सदस्य आणि पुरुष सदस्य उपस्थित होते. इत्यादी सभासदांनी सहकार्य केले.

# 18 जानेवारीला शिक्षक परिषदेचे नागपूर जिल्हा अधिवेशन




**हिंगणा :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर ग्रामिण जिल्ह्याचे जिल्हा अधिवेशन डोणेकर सभागृह कन्हान येथे दि. 18 जानेवारी 2026 ला संपन्न होत आहे. या अधिवेशनात शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत समस्यांवर विचारमंथन होणार आहे. तेंव्हा हिंगणा तालुक्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन म.रा. शिक्षक परिषदेला बळकट करण्याचे आवाहन माजी आमदार नागो गाणार, नागपूर जिल्हा अध्यक्ष मिनानाथ सातपुते, कार्यवाह राजीव तांदुळकर, पालक सुधीर वारकर, सहकार्यवाह धनंजय जिचकार, हिंगणा तालुका पदाधिकारी मनोज नेहाने, नितीन आष्टणकर व संतोष आत्राम यांनी हिंगणा तालुक्यातील विविध शाळेत भेटी देऊन अधिवेशनाचे निमंत्रण दिले. अधिवेशनात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, चतुर्थ श्रेणी शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध घोषित करणे, दहा, विस व तीस वर्षे सेवेनंतर सरसकट विनाअट सर्वांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे, बीएलओ जनगणना व इतर अशैक्षणिक कामे शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न देणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीस मान्यता देणे, वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी विनाड सरसकट लागू करणे, बालसंगोपन रजा संदर्भात शिक्षण विभागाचा शासन निर्णय त्वरित निर्गमित करणे व प्रलंबित शालार्थ आय.डी. तात्काळ निर्गमित करणे व ऑनलाईन शालार्थ मध्ये समाविष्ट करणे इत्यादी मागण्यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

# महाराष्ट्रात वंचित समाजाची ताकद दाखवा : डॉ. भीमराव आंबेडकर




**नागपूर :** आता रिपब्लिकन नाव घेणारे व त्यांचे नेते मनुवादी विचाराचे गुलाम बनले असून ते आता संपले आहेत. त्यांनी आंबेडकरी विचाराला तीलांजली दिली आहे. त्यामुळे या निवडणुकीत वंचित समाजाची ताकद दाखवावी आणि वंचित बहुजन आघाडीचे सर्व उमेदवार निवडून आणावेत व त्यांना सत्तेत पाठवावे तरच आपले प्रश्न सुटलील असे प्रतिपादन डॉ. भीमराव य आंबेडकर ( ट्रस्टी/राष्ट्रीय कार्याध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष, समता सैनिक दल) यांनी शताब्दी चौक, नागपूर येथे दि. 11/1/2026 रोजीच्या प्रभाग क्रमांक 35 च्या जाहीर सभेत केले. तसेच डॉ. भीमराव आंबेडकर यांनी महाराष्ट्रातील 29 महानगर पालिकेची निवडणुक 15 जानेवारी 2026 रोजी असून विविध जिल्ह्यात ॲड प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उभे केलेले आणि पुरस्कृत केलेले सर्व उमेदवार आहेत त्या सर्वांना प्रचंड मताने निवडून द्यावे असे आवाहन केले. ॲड एस के भंडारे (ट्रस्टी /राष्ट्रीय उपाध्यक्ष, केंद्रीय कार्यालय प्रमुख) यांनी संविधान विरोधी पक्षाच्या पैसे, दारू, जेवणाला बळी पडू नका आपले मत विकू नका, स्वाभिमामाने वंचित बहुजन आघाडीला मतदान करून संविधान विरोधक, विषमता व मनुवादी यांना हरवावे असे सांगितले. डॉ. भीमराव आंबेडकर, ॲड एस.के. भंडारे, पद्माकर गणवीर (राष्ट्रीय संघटक) यांनी प्रभाग क्रमांक 9,21,26,23, 35 मध्ये उमेदवारांनी आयोजित केलेल्या इतर जाहीर सभा कॉर्नर सभा, प्रचार कार्यालयाचे उद्घाटन, बुद्ध विहार भेट, रॅली इत्यादी मध्ये सहभाग घेऊन मार्गदर्शन केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा/समता सैनिक दल चे भीमराव फूसे (राज्य संघटक), वंचित बहुजन आघाडीचे मंगेश वानखडे (नागपूर महानगर अध्यक्ष) प्रा. अनिकेत मून (निरीक्षक), विजय मेश्राम, पपिता खोब्रागडे, सुधा मेश्राम, गौतम पाटील हे उपस्थित होते. तसेच उमेदवार विशालभाऊ वानखेडे, बबनभाऊ वाणकर, संगीता गोधनकर, विजय पाटील, रविंद्र तुळशीराम चव्हाण (तागडे), राकेश दशरथ धारगावे, प्रतीक विनायक इंदुरकर इत्यादी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, वंचित बहुजन आघाडी आणि आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूर महानगरपालिका निवडणूक मतदानापूर्वी नागरी समस्यांचा हिशोब द्या : शहरातील नागरिक आक्रमक

**नागपूर :** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरातील नागरी समस्यांचा प्रश्न पेटला आहे. मूलभूत सोयीसुविधांच्या भीषण दुरवस्थेमुळे प्रशासनाविरुद्ध संताप व्यक्त करत द प्लॅटफॉर्म आणि ठवरे कॉलनी संघर्ष समितीने आता थेट न्यायालयीन लढाईचा पवित्रा घेतला आहे.




पाणी प्रश्नावर मनपा आणि OCW ला कायदेशीर इशारा ठवरे कॉलनी, मायानगर, इंदोरा, अशोक नगर, आणि इतर परिसरातील रहिवासी दीर्घकाळापासून दूषित आणि अपुऱ्या पाणीपुरवठ्याचा सामना करत आहेत. या संदर्भात द प्लॅटफॉर्म आणि संघर्ष समितीने OCW व मनपा प्रशासनाशी पत्रव्यवहार केला असता, इंदोरा ते भीम चौक दरम्यान नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम प्रलंबित असल्याची माहिती समोर आली. हे काम पूर्ण होण्यासाठी किमान वर्षभर लागू शकेल असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

यावर द प्लॅटफॉर्मने आक्रमक भूमिका घेत मागणी केली आहे की, नवीन पाईपलाईनचे काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांना वाऱ्यावर सोडता येणार नाही. तोपर्यंत पर्यायी व्यवस्था म्हणून दररोज दोन वेळा 1 ते 2 तास पाणीपुरवठा करणे अनिवार्य आहे. जर ही समस्या तातडीने सोडवली गेली नाही, तर मनपा प्रशासनाला न्यायालयात खेचण्याचा इशारा द प्लॅटफॉर्म व नागरिकांनी दिला आहे.

पाण्याव्यतिरिक्त नागरी सुविधांचा बोजवारा (प्रमुख समस्या)

निवडणुकीच्या रिंगणात उतरणाऱ्या प्रत्येक उमेदवारासमोर नागरिकांनी खालील समस्यांचा पाढा वाचला आहे. जुन्या व तुंबलेल्या गटार लाईन्स पावसाळ्यात जुन्या गटार लाईन्स वारंवार चोक होत असल्याने सांडपाणी थेट रहिवासी वस्त्यांमध्ये आणि रस्त्यांवर शिरत आहे.

**अनियमित कचरा संकलन :** 'कचरा गाडी' नियमित येत नाही, अनेकदा गाड्या रोजच्या फेऱ्या न मारता निघून जातात. साफसफाईचा अभाव : रस्ते झाडणे आणि गल्ल्यांची स्वच्छता करण्याची कामे नियमितपणे केली जात नाहीत. उद्यानांची दुरवस्था : सार्वजनिक उद्यानांकडे दुर्लक्ष झाले असून, मुलांच्या खेळण्यांचे साहित्य तुटलेल्या अवस्थेत आहे, ज्याची दुरुस्ती केली जात नाही.

**कोलमडलेल्या पायाभूत सुविधा :** मूलभूत नागरी पायाभूत सुविधांची कामे महिना महिने प्रलंबित असून प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष आहे. नोकरभरतीतील अपयश : मनपा मध्ये कर्मचारी कमतरतेमुळे कामे रखडल्याचे अधिकारी मान्य करतात. मात्र, वाढत्या बेरोजगारीच्या काळातही मनपा प्रशासन रिक्त पदे का भरत नाही? या दिरंगाईमुळे अत्यावश्यक सेवा कोलमडल्या असून सामान्य नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे.

**मतदारांचा ठाम निर्धार :** लोकशाहीच्या या निवडणुकीत आता नागरिकांनी आपले अस्त्र उपसले आहे. जो उमेदवार या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर केवळ आश्वासन न देता लेखी हमी देईल, त्यालाच मत देण्याचा पवित्रा रहिवाशांनी घेतला आहे. 'स्वच्छ व नियमित पाणी आणि इतर नागरी सुविधा मिळणे हा कोणाचे उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. जो उमेदवार या समस्या सोडवण्याची लेखी हमी देईल, त्यालाच जनता आपले मत देईल.'9 राजीव खोब्रागडे( सदस्य - द प्लॅटफॉर्म)

## Public Notice

**IN THE COURT OF JOINT CIVIL JUDGE JUNIOR DIVISION. NAGPUR**

Room No. 416-A
Fixed for : 13/02/2026

**M.J.C. Case No. 1216/2025**

**Applicant :**
1) Rajani Sunil Dharkar
2) Aakansha Sunil Dharkar
3) Akshata Sunil Dharkar
4) Anway Sunil Dharkar

**--Versus --**

**Non-Applicants : Nil**
**Name of Deceased :** 1)Sunil Maniram Dharkar
Died on : 06/10/2024
R/o Plot No. 69, Near Mahalaxmi Kirana Stores Paradise Society, Sonegaon, Nagpur

Whereas **Sunil Maniram Dharkar Died on : 06/02/2024 R/o Plot No. 69, Near Mahalaxmi Kirana Stores Paradise Society, Sonegaon, Nagpur** and Whereas Rajani Sunil Dharkar & Oth. has presented an application to this Court for grant of **Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act. 1827.**

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicants **Rajani Sunil Dharkar & Oth.** as Legal Heir of the **deceased** to appear in the Court of **Joint Civil Judge Junior Division, Nagpur on 13th Day of Feb., 2026 at 10.30 A.M.** there to enter their objections and it is hereby declared that i no sufficient objections if offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provided they shall appear entitled thereto a Certificate of Legal Heir of the said **deceased.**

Given under my hand and the seal of the court, that **8th day of Jan., 2026.**

By order of the Court

Asstt. Supdt. (T.W.)
Civil Judge Sr. Dn.,
Nagpur

**Show cause Notice as to why Decree should not be executede agains you J.dr.**

Room No.515

**IN THE COURT OF 3rd JOINT CIVIL JUDGE SINIOR DIVISION , NAGPUR**

**R.D. No. 229/2024** **Fixed for : 11/02/2026**

Decree Holder : **Prahlad Dharmaji Wankhede**

**-Versus-**

Judgment Debtors : **N C Chakranarayan & others**

To,

**1)N.C. Chakranarayan,**
**R/o Quarter No. 98/2, SRPF Camp, Hingna Road[ Nagpur 440016.**

**2) Naresh Vighne**
**R/o Plot No. 18, Vaishali nagar, Beside Yuvraj Saloon, Nagpur 440016.**

Whereas the above-named Decree Holder has institude a Regular Darkhast for passing regular decree, in the court that you are hereby notice to appear in this court in person or by a pleader duly intructed on the **Dt. 11/02/2026** at 11.00 O'clock in the forenoon, to answer the same failing wherein the said application (i.e. Regular Darkhast) will be heard and determined Ex parte in your absence.

Also take notice that in default of your filing an address for service on or before the date mentioned you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the court, that 02nd day of Jan., 2026.

by order of the Court

Asstt. Supdt.
Court of Civil Judge Sr. Dn.,
Nagpur.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648